CMYK

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




### १६ ऑगस्टची डेडलाईन

**मुंबई :** परप्रांतीय रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी सक्तीबाबत १६ ऑगस्टची डेडलाईन निश्चित करण्यात आली आहे. १ मे ते १५ ऑगस्ट या कालावधीत अ-मराठी भाषिकांना मराठी शिकता यावे, यासाठी परिवहन विभागाने विशेष 'मराठी मार्गदर्शन पुस्तिका' प्रकाशित केली असून, या मोहिमेनंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे..

### एसव्हीसी बँकेची आघाडी

**मुंबई :** एसव्हीसी या देशातील आघाडीच्या शहरी सहकारी बँकांपैकी एक असलेल्या संस्थेने ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी उल्लेखनीय आणि स्थिर कामगिरी नोंदवली आहे. बँकेचा एकूण व्यवसाय ४३,६९३ कोटी रुपयांवर पोहोचला असून, बदलत्या बँकिंग वातावरणा-तही सातत्यपूर्ण वाढ आणि लवचिकता अधोरेखित झाली आहे. ठेवींमध्ये लक्षणीय वाढ होत त्या २२,३८० कोटींवरून २४,९५६ कोटींवर गेल्या, तर कर्जवाटप १६,९७३ कोटींवरून १८,७३७ कोटींवर पोहोचले आहे, ज्यातून बँकेच्या संतुलित वाढीची दिशा स्पष्ट होते.

### गुंडाची निर्घृण हत्या

**पुणे : गंगानगर परिसरात भर रस्त्यात कोयत्याने सपासप वार करत तडीपार गुंड राणा कांबळे याची निर्घृण हत्या करण्यात आली. वर्चस्वाच्या वादा-तून ओम मोरे आणि त्याच्या साथीदारांनी हा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून पोलिसांनी फुटेज ताब्यात घेत आरोपींचा शोध सुरू केला आहे. मागील दहा दिवसांतील ही तिसरी हत्या असल्याने पुण्यात भीतीचे वा-तावरण निर्माण झाले आहे**

### बसचा अपघात

**जळगाव :** २५ ते ३० प्रवासी घेऊन जाणारी धुळे-भुसावळ बसचा एरंडोलजवळ चाक निखळल्याने मोठा अपघात झाला. या अपघातात जवळपास १० ते१५ प्रवासी जखमी झाले आहेत. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झालेली नाही.

### गायत्रीदेवी भाजपमध्ये जाणार ?

**सातारा : सातारा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा आणि औंध संस्थानाच्या पंतप्रतिनिधी गायत्रीदेवी या भाजपच्या वाटेवर आहेत. त्यांच्या या पवित्र्यामुळे सातारा जिल्ह्या-तील राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. औंध परिसरातील विकासकामांना गती देण्यासाठी गायत्रीदेवींनी भाजपचा झेंडा हाती घ्यावा, असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला आहे. गायत्रीदेवी या खटाव तालुक्यातील अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्या लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.**

### एमआयडीसीत भीषण आग

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमधील शेंद्रा पंचतारांकित एमआयडीसीत भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. स्क्रॅपचं गोडाऊन जळून खाक झालं आहे. आ-गीने रौद्ररुप समोर आल्याचं सांगण्यात आलं आहे. सुदैवाने जीवितहानी टळली असून कोणीही अडकले नसल्याची प्राथमिक माहिती देखील मिळाली आहे.

# जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर ?

**वृत्तसंस्था**

**वॉशिंग्टन :** डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला आता 'माझा अंत पाहू नका' असा थेट इशारा दिला आहे. त्यामुळे आता इराणने शांतता करारावर स्वाक्षरी न केल्यास, अमेरिका संपूर्ण जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या दरीत ढकलणार की, काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.हातात बंदूक, नजरेत आक्रमकता आणि इराणला शहाणे होण्याचा इशारा. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ सोश-लवर शेअर केलेल्या एका फोटोसह संपूर्ण जगात खळबळ उडवली आहे. इराणसोबतचे शांतता कराराचे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर आता ट्रम्प यांनी 'नो कॉम्प्रोमाईज' धोरण स्वीकारले असून, या संघर्षाचे रूपांतर तिसऱ्या महायुद्धात होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्याट्रूथ सोशल प्लॅटफॉर्मवरइराणला 'तुम्ही माझा अंत पाहू नका' असा



इशारा दिला आहे. त्यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, 'इराणला स्वतःला सावरता येत नाही. अण्वस्त्रविरहित करारावर स्वाक्षरी कशी करायची हे त्यांना माहीत नाही. त्यांनी लवकरच शहाणे व्हायला हवे!' या पोस्टसह ट्रम्प यांनी त्यांचा एक फोटोही शेअर केला ज्यामध्ये ते, काळ्या सुटमध्ये, हातात बंदूक घेऊन अटॅक मोडमध्ये उभे असताना दिसत आहेत. तसेच फोटोवर 'आता चांगुलपणा पुरे!'असे ठळक अक्षरातले कॅप्शन देण्यात आले आहे.एकीकडे, शांतता करारासाठी इराणसोबत वाटाघाटी सुरू आहेत, इराण आणि अमेरिका दोन्ही देश एकमेकांच्या अटींवर सहमती दाखवण्यास तयार नाहीत, आतापर्यंत झालेल्या शांतता चर्चेचे तीनही मोठे प्रयत्न फिस्कटले अशातच डोनाल्ड ट्रम्प यांच्या या वक्तव्यामुळे आता पुढील काळात; शांतता करारासाठी सहकार्य न दाखवल्यास ट्रम्प यांच्या या 'नो कॉम्प्रोमाइज' धोरणामुळे जग आता तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे.शांतता करारातील अमेरिकेच्या अनेक अटी इराणला अद्याप मान्या नाहीत. त्यामुळे शांतता चर्चेच्या तारखा सतत पुढे जात असल्याने, अमेरिका इराणवर आता आर्थिकदृष्ट्या दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. मंगळवारी डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनाहोर्मुझवर नाकेबंदीकरण्यासाठी सज्ज राहण्याचे आदेश दिले. त्यांनी असेही सांगितले की, 'इराण आता कोलमडण्याच्या अवस्थेत आहे, त्यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी त्वरीत पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करत आहेत.'

## विधान परिषद निवडणुकीवरून महाविकास आघाडीत फूट ?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** विधान परिषदेच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीचं संख्याबळ पाहता केवळ एक उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे. असं असलं तरी महाविकास आघाडीत या निवडणुकीत फूट पडताना दिसत आहे. कारण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून अंबादास दानवे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. यामुळे काँग्रेस आता आपला उमेदवार निवडणुकीच्या रणांगणात उतारणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही भूमिका मांडली आहे. हर्षवर्धन सपकाळ हे सध्या दिल्लीत आहेत. दिल्लीत पक्षश्रेष्ठींसोबत चर्चा करुन काँग्रेसचा उमेदवार ठरणार असल्याची माहिती आहे. पण काँग्रेसने खरंच उमेदवार दिला तर ही निवडणूक चुरशीची ठरेल. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून अंबादास दानवे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. एकूण ९ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. पक्षीय बलाबल पाहता महाविकास आघाडीच्या कोटात एक जागा जिंकण्याइतपत मते आहेत. त्यामुळे या एका जागेसाठी महाविकास आघाडीच्या तीन पक्षांमध्ये रस्सीखेच सुरु होती. राज्यसभेच्या निवडणुकीवेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षा-चे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांना पाठिंबा जाहीर केला होता. त्यानंतर शरद पवार यांनी विधान परिषदेला उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी लढवावी, आपला त्यांना पाठिंबा असणार असल्याचं स्पष्ट केलं होतं.

## आता महायुती सरकारचेही एक दिवसीय विशेष अधिवेशन !

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी महायुती सरकार आता मैदानात उतरले आहे. लवकरच महायुती सरकार महिला आरक्षण विधेयकासाठी मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आल्याची माहिती समोर आली आहे. आर-क्षण विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी महायुती सरकार एक दिवसीय विशेष अधिवेशन घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.



या प्रस्तावित अधिवेशनाद्वारे केवळ राज्यातीलच नव्हे, तर देशभरातील महिलांसाठी सकारात्मक संदेश देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे. महिला आरक्षणासाठी घेण्यात येणारं हे एक दिवसीय विशेष अधिवेशन मे महिन्यात पार पडणार आहे. मात्र असं असलं तरी ते नेमकं कधी होणार याच्या तारखे संदर्भात अद्याप स्पष्टता नाही. पण लवकरच ती तारीख जाहीर होईल. तर महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर ठोस भूमिका मांडण्यासाठी सर्वपक्षीय आमदारांना या विशेष अधिवेशनात सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.महिला आरक्षण अधिनियमाशी संबंधित घटना (१३१वे) दुरुस्ती विधेयक २०२६, डिलिमिटेशन विधेयक २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायदा (दुरुस्ती) विधेयक २०२६ यावर गेल्या आठवड्यात संसदेत चर्चा झाली. यानंतर १३१व्या संविधान दुरुस्तीवर चर्चेनंतर विधेयकावर मतदान घेण्यात आलं. मात्र हे विधयक मंजूर झालं नाही. लोकसभेत महिला आरक्षण नामंजूर झाल्यानंतर महाराष्ट्रातही महायुती सरकारने या विधेयकाच्या बाजून भूमिका घेत विरोधकांवर हल्ला चढवला होता. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत अनेक मुद्दे मांडले. विरोधकांनी महिला विरोधातील मानसिकता दाखवली. त्यांनी ७० कोटी महिलांचा विश्र्वासघात केला अशी टीका फडणवीस यांनी केली होती. विरोधकांनी सरड्यासारखे रंग बदलले, त्यांनी नारीशक्तीचा मोठा अपमान केला आहे, अशा शब्दांत फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली.दरम्यान, आता राज्य सरकारने महिलांसाठी विशेष भूमिका घेतली असून त्यासाठीच हे एकदिवसीय विशेष अधिवेशन घेण्यात येणार असल्याचं समजतंय. त्यामुळे महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर राजकीय हालचालींना वेग आला असून, या अधिवेशनाकडे राज्यासह देशाचेही लक्ष लागले आहे.

### युरोप ट्रिप बुकिंगचा बनाव

**बंगळूरु : बंगळूरु :** येथील एका सॉफ्टवेअर इंजिनिअर महिलेला फेसबुकवरील ट्रॅव्हल पेजच्या माध्यमातून युरोप सहलीचे बुकिंग करणे चांगलेच महागात पडले आहे. ऑनलाइन ट्रॅव्हल स्कॅमला बळी पडल्यामुळे या महिलेने तब्बल ११.५ लाख रुपये गमावले आहेत. सहलीसाठी ट्रॅव्हल पॅकेज सर्च'डेक्कन हेराल्ड'च्या वृत्तानुसार, ईशान्य बेंगळुरूमध्ये राहणाऱ्या ३३ वर्षीय महिला सॉफ्टवेअर इंजिनिअरने ही तक्रार दाखल केली आहे.

थनिसंद्रा भागात राहणारी ही महिला एका खासगी कंपनीत कार्यरत आहे. सहलीसाठी ट्रॅव्हल पॅकेज शोधत असताना तिला फेसबुकवर एक पेज दिसले. महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिने युरोप ट्रिपच्या चौकशीसाठी फेसबुक पेजवर दिलेल्या दोन फोन नंबरवर संपर्क साधला. संशयित आरोपींनी तिला सहलीच्या पॅकेजचे सविस्तर तपशील पाठवले आणि ही प्रक्रिया पूर्णपणे कायदेशीर असल्याचे भासवून तिचा विश्र्वास संपादन केला.

# म्हाडाने वाढवली मुदत

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबई या मोठ्या शहरामध्ये स्वतःचं हक्काचं घर घेणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. असे स्वप्नं पाहणाऱ्या प्रत्येक इच्छुकांसाठी आता एक मोठी खुशखबर समोर आली आहे. मुंबई म्हाडाच्या मंडळाने आता २६४० घरांच्या गृहनिर्माण सोडतीसाठी अर्ज करण्याची मुदत आता वाढवण्यात आल्याची माहिती दिली आहे. ज्या नागरिकांना आतापर्यंत यामध्ये अर्ज करता आले नव्हते त्यांच्यासाठी आता ही सुवर्णसंधी मानली जात आहे.




म्हाडाने दिलेल्या नव्या मुदतीनुस-ार आता मुंबईतल्या घरांसाठी तुम्ही १४ मे २०२६ पर्यंत अर्ज करु शकणार आहात. म्हाडाने मुदतवाढ देण्यामागचं कारण काय आता हा प्रश्न तुम्हालाही साहजिकच पडला असण-ार, तर म्हाडाच्या या योजनेला अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद मिळत असल्याचे निदर्शनास आलेच हो-ते, पण अनेक इच्छुकांनाही तांत्रिक अडचणींमुळे त्यांचे अर्ज भरता आले नव्हते. त्याचकारणांच्या पार्श्र्वभूमिवर मुदतवाढीचा हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती म्हाडा प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे आता मध्यमवर्गीय किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांनाना आता त्यांची स्वप्नपूर्ती करण्यासाठी आणखी वेळ मिळाला आहे.

नागरिकांना या मुदतीमुळे त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अतिरिक्त वेळही मिळणार आहे.

# भीषण अपघातात नववधूसह तिघांचा दुर्दैवी अंत

**तभा वृत्तसेवा**

**जळगाव :** जळगाव जिल्ह्या-तुन एक भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. जळगाव जिल्ह्याच्या धरणगावमध्ये एक अतिशय हृदयद्रावक अपघा-ताची घटना घडली आहे. धरण-गाव तालुक्यातील वराडखुर्दजवळ महामार्गावर टायर फुटल्याने भीषण कार अपघात झाला असून लग्नाहून परतणाऱ्या क्रूझर गाडीला टँकरवर धडक बसली, यात नववधूसह ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जण गंभीर जखमी झाले असून





एका लहान मुलाची प्रकृती चिंताजनक आहे. आनंदाच्या क्षणावर अशाप्रकारे विरझन पडल्याने परिसरातून हळहळ व्यक्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातच्या वापी येथून लग्नाचं वऱ्हाड घेऊन अकोला येथे ही क्रूझर कार जात होती. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील वराडखुर्द जवळ महामार्गावर असतानाच या धावत्या क्रूझर कारचं टायर अचानक फुटलं आणि ही कार त्या रोडलगत उभ्या गॅस टँकरवर जाऊन धडकली. अतिशय भीषण अशी ही धडक होती. लग्न झाल्यानंतर नववधूला परत घेऊन येताना जळगाव मधील वराड गावाजवळ हा अपघात घडला आहे. यामध्ये तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, जिचं नुकतंच लग्न झालं अशा नववधूचाही मृतांमध्ये समावेश असून त्यामुळे सगळेच हळहळले. नववधूच्या हाताची मेहंदीही सुकली नव्हती, आता कुठे संसाराची स्वप्ने रंगू लागली होती आणि अशाप्रकारे अपघात नववधूचा दुर्दैची अंत झाला. या अपघातात नववधू पूजा रवी वाघळकर, दत्तू भागवत, जगदीश वाघळकर अशी अपघातात मृत झालेल्यांची नावे असून तिघेही एकच कुटुंबातील असल्याची माहिती समोर आली आहे. तर या अपघातात आणखी ६ जण जखमी असून लहान मुलाची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

जळगाव जिल्हा रुग्णालयात नातेवाईकांनी एकच आक्रोश केल्याचे दिसून आलं. वऱ्हाड घेऊन निघालेल्या कुटुंबावर अशाप्रकारे काळाने घाला घातल्याने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुर्दैवी घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून काळानं अशी अचानक **झडप घातल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे.**

### केबल गळ्यात अडकून महिलेचा दुर्दैवी मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**पुणे :** निगडी प्राधिकरण परिसरात तुटलेली केबल गळ्याला अडकून दुचाकीवरून पडल्याने एका महिलेचा मृत्यू झाला. संपदा पटवर्धन (वय ५०) असे या महिलेचे नाव आहे. वीस दिवसांपूर्वीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. त्या धक्क्यातून कुटुंबीय सावरण्याआधीच पुन्हा त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे पटवर्धन यांचा बळी गेल्याचा आरोप होत आहे.

घरातील काही साहित्य आणण्यासाठी संपदा पटवर्धन बाहेर गेल्या होत्या. परतत असताना सेक्टर २६ मधील प्रबोधन सोसायटीतून ज्ञानप्रबोधिनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर लोंबकळणारी केबल गळ्यात अडकल्याने त्या दुचाकीवरून खाली पडल्या. गाडीचा आवाज आल्याने जवळपास असलेल्या मुलांनी त्यांना निगडीच्या खासगी रुग्णालयात दाखल केले.वडिलांच्या मृत्यूनंतर पटवर्धन यांनी आईला आपल्या घरी राहण्यास बोलावले हो-ते. वडिलांच्या धक्क्यातून बाहेर पडण्याआधीच काळाने घातलेल्या या घाल्यामुळे त्यांच्या आईसह कुटुंबावर मोठा आघात झाला.

## आयपीएल पाहून येणाऱ्या चुलत भावंडांचा अपघाती मृत्यू



**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली: 'पप्पा, खूप मजा आली. आम्ही अर्ध्या तासात घरी पोहोचू.' १४ वर्षांच्या अभाव भाटियाचे हे शब्द अखेरचे ठरले. आयपीएलचा सामना संपल्यानंतर अभाव तिचा चुलत भाऊ यज्ञ सोबत घरी जाण्यास निघाला. तेव्हा त्याचं वडिलांशी फोनवरुन बोलणं झालं. याच दरम्यान त्यांना एका ट्रकनं धडक दिलं. अभाव त्याच्या चुलत भावाच्या मागे दुचाकीवर बसला होता. वडिलांसोबत फोनवर बोलत असताना ट्रकनं दुचाकीला जोरदार धडक दिली.**

**अभावनं रात्री १० वाजून २७ मिनिटांनी वडील सुमित भाटिया यांना फोन केला होता. अभाव फोनवर बोलत होता. काही वेळ बाप लेकांमध्ये व्यवस्थित संवाद सुरु होता. तितक्यात सुमित यांना मोठा आवाज ऐकू आला. अभाव आणि यज्ञ सोबत काहीतरी अघटित घडल्याचा विचार तेव्हाच सुमित यांच्या मनात आला.**

**अभाव सोबत फोनवर बोलत असताना सुमित यांना मोठा आवाज ऐकू लागला. त्यांची भितीनं गाळण उडाली. ते फोनवर जोरजोरात ओरडू लागले. पण समोरुन काहीही प्रतिसाद मिळत नव्हता. काही मिनिटांनी एका अज्ञात व्यक्तीचा आवाज ऐकू आला. तेव्हा सुमित यांना अपघाताबद्दल समजलं. यानंतर सुमित आणि त्यांच्या कुटुंबानं मध्य दिल्लीतील अशोका रोडवरील अपघातस्थळी धाव घेतली. डॉ. राम मनोहर लोहिया रुग्णालयाच्या शवागारात अभाव आणि यज्ञचं शव ठेवण्यात आलं. तिथे पोहोचताच अभाव आणि यज्ञच्या वडिलांना अश्रू अनावर झाले. दोघेही त्यांच्या वडिलांचे एकुलते एक मुलगे होते.**

## खत तुटवड्यावर भारताचा 'मास्टर स्ट्रोक'

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** पश्र्चिम आशियातील युद्धामुळे खतांचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या सोयीसाठी भारताने रशियासोबत २० हजार कोटी रुपयांचा संयुक्त युरिया प्रकल्प स्थापन केला आहे. तो येत्या दोन वर्षांत कार्यान्वित होऊन त्याद्वारे भारताचे खतांसाठीचे विदेशांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे.रशियाची 'युरालकेम' आणि भारताच्या तीन प्रमुख कंपन्या यांच्या संयुक्त विद्यमाने रशियातील समारा येथील तोग्लियात्ती येथे हा प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाची वार्षिक उत्पादन क्षमता २० लाख टन इतकी असेल. भारतीय शेती प्रामुख्याने नायट्रोजनयुक्त युरियावर अवलंबून आहे. भारत दरवर्षी सुमारे ३०० लाख मेट्रिक टन युरियाचे उत्पादन करतो. तथापि देशाची एकूण गरज ४०० लाख मेट्रिक टन आहे. ही तूट भरून काढण्यासाठी भारत ७१ टक्के युरिया मध्य पूर्वेतील देशांकडून आयात करतो. मात्र, होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी झाल्यामुळे गॅस आणि खतांच्या पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या भारत भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत यासंदर्भात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वाळूज महानगरात पायाभूत सुविधा तातडीने विकसित करा– असीमकुमार गुप्ता

छत्रपती संभाजीनगर, दि. 29 : सिडको वाळूज महानगर परिसर छत्रपती संभाजीनगर महानगर विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित झाला असून, या परिसरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधा तातडीने विकसित करणे आवश्यक आहे. यासाठी विकास आराखड्यासह निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नगर विकास विभागाकडे त्वरीत सादर करावा, असे निर्देश नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता यांनी दिले.

सिडको वाळूज महानगर परिसराच्या विकासासंदर्भात मुंबई येथे असीमकुमार गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस छत्रपती संभाजीनगर येथून विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, सहआयुक्त तसेच संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी गुप्ता यांनी वाळूज महानगर परिसराचा नकाशाव्दारे आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, वडगाव कोल्हाटी, वाळूज आणि बजाजनगर या भागांमध्ये वाढत्या लोकसंख्येला रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधा सुनियोजित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी प्राधिकरणाने सविस्तर विकास आराखडा तयार करावा. या आराखड्यासोबत आवश्यक निधीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असेही त्यांनी निर्देश दिले.

तसेच या प्रस्तावाच्या मंजुरीसाठी विभागीय आयुक्तांनी सातत्याने पाठपुरावा करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी वाळूज परिसरातील मोठ्या प्रमाणावर साचणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाकडेही लक्ष वेधले. पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच कचरा व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## गुगलने इंडिया एआय हबची पायाभरणी केली

मुंबई :गुगल ने भारतातील एआय हबसाठी पायाभरणी करत देशाच्या डिजिटल पायाभूत सुविधांच्या महत्त्वपूर्ण टप्प्याला नवी दिशा दिली आहे. अदाणी कॉनेक्स आणि नेक्स्ट्रा बाय एयरटेल यांच्या धोरणात्मक भागीदारीत विकसित करण्यात येणारा हा प्रकल्प 'विकसित भारत' साकारण्यासाठी गिगावॅट-स्तरीय एआय परिसंस्था उभारणार आहे. गोपाल विट्टल,एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरमन,भारती एअरटेल म्हणाले: "गुगल आणि अदाणी यांच्यासोबत या महत्त्वपूर्ण एआय हबच्या उभारणीसाठी असलेल्या आमच्या धोरणात्मक भागीदारीद्वारे आम्ही भारताच्या डिजिटल महत्त्वाकांक्षा पुढे नेण्यास मदत करू. विशाखापट्टणम जागतिक एआय नकाशावर एक नवीन केंद्र म्हणून उदयास येत असताना, आम्ही भारताला नवोपक्रम आणि शाश्वत वाढीमध्ये आघाडीवर ठेवू — केवळ आपल्या देशासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी. आमचे अत्याधुनिक डेटा सेंटर्स, हरित उर्जेचा वापर, देशभरातील अल्ट्रा-लो लेटन्सी फायबर आणि पुढील पिढीचे केबल लँडिंग स्टेशन यांच्या मदतीने विझागमध्ये मोठ्या प्रमाणावर जागतिक दर्जाची एआय पायाभूत सुविधा सक्षम होईल."

## 'देशाचा शेतकरी, देशाचा खरा नायक' या मोहिमेचा शुभारंभ'

मुंबई : : भारतातील संशोधन-आधारित कृषी-आदान कंपन्यांपैकी एक असलेल्या क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड ("क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन") ने आज अक्षय कुमार यांची आपला "ब्रँड ॲम्बेसेडर" म्हणून नियुक्ती जाहीर केली.या सहकार्याच्या निमित्ताने, क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनने अक्षय कुमार यांच्या सहकार्याने आपली पहिली राष्ट्रीय ब्रँड मोहीम 'देशाचा शेतकरी, देशाचा खरा नायक' सादर केली असून, ती भारतातील शेतकऱ्यांच्या योगदानाला आणि त्यांच्या दैनंदिन धैर्याला समर्पित आहे.

## आर्थिक वर्ष 2026 च्या चौथ्या तिमाहीतवाढ नोंदवली

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि संपूर्ण आर्थिक वर्षासाठीचे ऑडिट केलेले आर्थिक निकाल मंजूर केले आहेत.निकालांवर भाष्य करताना, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, "बँकेची मालमत्ता गुणवत्ता स्थिर राहिली आहे. आम्ही नेहमीच नमूद केले आहे की मायक्रो-फायनान्स पोर्टफोलिओ वगळता सर्व व्यवसायांची मालमत्ता गुणवत्ता चांगली कामगिरी करत आहे, कारण आर्थिक वर्ष 25 आणि आर्थिक वर्ष 26 दरम्यान हा मुद्दा संपूर्ण उद्योगासाठी होता.

## पेकोप चे यशस्वी अधिग्रहण

पुणे : भारतातील अग्रगण्य कीटक नियंत्रण आणि स्वच्छता सेवा प्रदाता, रेंटोकिल पीसीआय, पेकॉप पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा. लि. ("पेकॉप") च्या यशस्वी अधिग्रहणाची घोषणा करताना आनंदित आहे. या अधिग्रहणामुळे रेंटोकिल पीसीआयची, विशेषतः पश्चिम विभागातील ग्राहकांना सेवा देण्याची क्षमता अधिक मजबूत झाली आहे. या अधिग्रहणामुळे, पेकॉपचा ग्राहक पोर्टफोलिओ, अनुभवी कर्मचारी वर्ग आणि कार्यात्मक मालमत्ता रेंटोकिल पीसीआय नेटवर्कमध्ये समाविष्ट करण्यात येत आहेत. ही एकत्रीकरण प्रक्रिया नवोपक्रम, उत्कृष्ट सेवा आणि शाश्वत वाढ या समान दृष्टिकोनाने प्रेरित असलेल्या दोन संस्थांना एकत्र आणते.

## 'विवो इग्नाइट'च्या चौथ्या आवृत्तीची घोषणा

मुंबई - विवोने अनेक प्रतिष्ठित संस्थांसोबत भागीदारी केली आहे: एनसीईआरटी, आयआयटी मद्रासचे टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हब (टीआयएच), आयटीएम प्रवर्तक टेक्नॉलॉजी फाउंडेशन, सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन (एसओएफ), आणि यूएन ग्लोबल कॉम्पॅक्ट नेटवर्क इंडिया (यूएनजीसी एनआय).नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड विवो इंडियाने आज आपल्या प्रमुख शैक्षणिक उपक्रमाच्या, 'विवो इग्नाइट: अ टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन इनिशिएटिव्ह'च्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली. इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या या राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रमाचा उद्देश तरुण नवोन्मेषकांना आणि पुढच्या पिढीतील तंत्रज्ञान नेत्यांना घडवणे हा आहे. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना अर्थपूर्ण उपायांमध्ये रूपांतरित करण्याची आणि भारताच्या भविष्यासाठी गंभीर जागतिक आव्हानांना सामोरे जाण्याची संधी देतो.

## 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन'चा भव्य शुभारंभ महाराष्ट्र दिनी १ मे रोजी

छत्रपती संभाजीनगर : मराठी भाषा, संस्कृती, परंपरा यांचा प्रचार-प्रसार आणि जागतिक स्तरावर मराठी समाजाचे एकत्रीकरण साधणे या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन' या नव्या जागतिक व्यासपीठाचा भव्य शुभारंभ महाराष्ट्र दिनी शुक्रवारी १ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता ऐतिहासिक आळंदी येथे होत आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या कृपासानिध्यात फाउंडेशनच्या संकल्पनेचे प्रणेते आणि लोकमंगल उद्योग समूहाचे संस्थापक आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या नेतृत्वात फ्रुटवाले धर्मशाळा, आळंदी येथे हा सोहळा पार पडणार आहे.मराठी भाषा, संस्कृती आणि उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या

# बिडकीन औद्योगिक वसाहतीत दोन तरुणांची मृतदेह आढळले

तभा वृत्तसेवा





**बिडकीन दि २९ एप्रिल |** बिडकीन येथील (डिएमआयसी) मधे दिल्ली मुंबई औद्योगिक वसाहतीत आज सकाळी व्यायाम करणाऱ्या नागरिकांना विषारी औषध घेतलेल्या दोन तरुणांचे मृतदेह रस्त्याच्या कडेला आढळून आल्यामुळे खळबळ उडाली आहे.नेहमी प्रमाणे काही नागरिक आज दि २८ मंगळवार रोजी सकाळी सात बाजेच्या सुमारास व्यायाम करण्यासाठी बिडकीन डि.एम. आय.सी.मधे गेले आसता त्यांना परिसरामध्ये एकाच ठिकाणी दोन तरुणांचे मृतदेह आढळून आले . मृतदेहाजवळ दुचाकी एम.एच.२० एफ.एक्स.६८४५ क्रमांकाची हिरो कंपनीची दुचाकी तसेच विदेशी दारू बाटली, पाणी बाटली, विषारी औषधीचा डब्बा (इंडोसल्फान) , तसेच दोघांचेही मोबाईल दिसुन आले आसता नागरिकांनी बिडकीन पोलिसांनी माहिती दिली. सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर , संजीवन कदम यांनी घटनास्थळी धाव घेऊन दोन्ही मृतदेह बिडकीन ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवली वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणिता मात्रे यांनी तपासून मयत घोषित करून शवविच्छेदन करून दोन्ही मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले. मयत गणेश काकासाहेब झिरपे (वय २३ या.कडेठाण ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ,ह मु सुर्य उद्योग नगर , बिडकीन ) तर दुसरा सचिन भगीरथ अरगडे (वय २९ धनगर पिंपरी ता .अंबड जि. जालना) हे आहे. दोन्ही तरुण हॉटेल कामगार असल्याची माहिती मिळाली असुन त्यांनी आत्महत्या का केली अद्याप स्पष्ट झाले नसुन पुढील तपास बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शहरातील विजेचा लपंडाव बंद करा

## भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांची मागणी



**छत्रपती संभाजीनगर |** आकाशवाणी परिसरासह शहरातील विविध वसाहतींमध्ये गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या वारंवार वीज खंडित होण्याच्या प्रकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेत विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याची तीव्र प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी व्यक्त केली.

यासंदर्भात शितोळे यांनी शहरातील नगरसेवकांसह महावितरणच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन नागरिकांच्या समस्या मांडल्या. फ्यूज कॉलवर प्रतिसाद न मिळणे, दुरुस्तीला होणारा विलंब आणि समन्वयाचा अभाव यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. वाढत्या तापमानात अखंडित वीजपुरवठा करणे अत्यावश्यक असून, महावितरणने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, कार्यकारी अभियंता महातोले, देशमुख व संबंधित उपअभियंते यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अधिकाऱ्यांनी सर्व समस्या ऐकून घेत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. विशेषतः बुधवारीपासून विविध डीपीवरील भार कमी करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे यांनी दिले. नाथनगर, अरिहंतनगर, विश्वभारती कॉलनी, त्रिमूर्ती चौक, बालाजीनगर, शिवशंकर कॉलनी, श्रीकृष्णनगर, भावदासनगर आदी भागांमध्ये दिवस-रात्र अचानक वीज खंडित होत असल्याची तक्रार यावेळी मांडण्यात आली. या सर्व भागांना अखंडित वीजपुरवठा मिळावा, अशी मागणी नगरसेवकांनी केली. या बैठकीस भाजपचे नगरसेवक जालिंदर शेंडगे, प्रदीप बुरांडे, नंदू गवळी, किशोर मानकापे, शंकर म्हात्रे, अर्चना निळकंठ आणि पद्मसिंग राजपूत उपस्थित होते.

## गोदा नर्मदा रॅली एकीकडे तर तालुक्यात पाणीटंचाईची भीषण स्थिती

# 108 गावांना टंचाईचा फटका; 94 विहिरी अधिग्रहण, 8 टँकरची गरज

तभा वृत्तसेवा




कन्नड दि. 28 एप्रिल : राज्यात जलसंधारण व नदीजोड प्रकल्पांच्या जनजागृतीसाठी जलसंपदा मंत्र्यांकडून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जनशताब्दी निमित्त 'गोदा ते नर्मदा' अशी रॅली काढण्यात येत असताना, कन्नड तालुक्यात मात्र पाणीटंचाईचे चित्र गंभीर होत असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार एकूण १०८ गावांना पाणीटंचाईचा फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर ९४ विहिरी अधिग्रहित कराव्या लागणार असून ८ ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागणार असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, केंद्राच्या महत्त्वाकांक्षी 'जलजीवन मिशन' अंतर्गत सुरू असलेली अनेक पाणीपुरवठा कामे अद्याप अपूर्ण अवस्थेत असून काही ठिकाणी कामे ठप्प झाल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे "घरघर नळ, प्रत्येकाला पाणी" हे उद्दिष्ट अजूनही कागदावरच असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

एकीकडे राज्यस्तरावर रॅलीद्वारे जलप्रश्नांवर जनजागृती केली जात असताना, दुसरीकडे कन्नड तालुक्यातील प्रत्यक्ष परिस्थिती मात्र गंभीर असल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. "रॅलीपेक्षा प्रत्यक्ष कामांना गती देणे गरजेचे नाही का?" असा सवाल स्थानिकांकडून केला जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तातडीने उपाययोजना राबविणे, रखडलेली कामे पूर्ण करणे आणि दीर्घकालीन नियोजनावर भर देणे आवश्यक आहे. अन्यथा उन्हाळ्यातील परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# देशातील असंघटित असलेल्या हिंदूंना संघटित करण्यासाठी संघाची स्थापना : राजीव जहागीरदार

## अजबनगर वस्तीचे हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर |** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीरामपंत हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते. संघ स्थापनेपूर्वी त्यांनी काँग्रेसमध्ये काम केले ते अनुशीलन समितीचे सदस्यही होते आपल्या देशाचा वैभवशाली इतिहास असूनही हिंदू असंघटित आहे ही बाब त्यांना खटकत होती आणि त्यामुळे त्यांनी विजयादशमी 1925 रोजी बाल सवंगड्यांना सोबत घेऊन नागपूर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली असे प्रतिपादन प्रमुख वक्ते राजीव जहागीरदार यांनी केले. ते अजब नगर वस्तीच्या दिनांक 26 एप्रिल 2026 रोजी विष्णू सॉ मिल प्रांगणात संपन्न झालेल्या हिंदू संमेलनात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर डॉ.सौ. सविता मुळे श्री. विश्वास नागापूरकर गुरुजी श्री विश्रामभाई पटेल सौ.विजया जोशी उपस्थित होते.

जहागीरदार पुढे म्हणाले संघाचे काम देशभरात आणि जगातल्या 50 देशात चालू आहे देशभरात 83129 दैनिक शाखा आणि 32147 साप्ताहिक मिलन चालतात. संघ शाखा म्हणजे वीज निर्मिती केंद्र पावर हाऊस असून तयार होणाऱ्या विजेमुळे शेतातील कृषी पंप टीव्ही कॉम्प्युटर मिक्सर चा अनेक गोष्टी चालतात पण ही वीज कुठे संघ शाखांमधून तयार झालेल्या या स्वयंसेवकांनी आरोग्य शिक्षण संस्कार स्वावलंबन या विषयावर ग्रामीण आणि शहरी भागात मिळून 129000 सेवा कार्य सुरू केले आहेत.

श्री.राजीव जहागीरदार यांनी संघशताब्दीचे निमित्ताने पंच परिवर्तनातील सामाजिक समरसता कुटुंब प्रबोधन स्वबोध पर्यावरण संरक्षण नागरिक कर्तव्य या मुद्द्यांवर सविस्तर प्रकाश टाकला तसेच हिंदू समाजासमोर संकटे आ वासून उभी आहेत त्यामुळे यापुढे जात भाषा पंथ सर्व विसरून हिंदूंनी एकत्र येण्याची आवश्यकता त्यांनी

समितीचे अध्यक्ष विश्रामभाई पटेल यांनी प्रास्ताविक केले, संदीप तळीखेडकर यांनी आभार मानले.

सौ.मधुबाला तोतला यांनी सूत्रसंचालन केले.

संपूर्ण वंदे मातरम च्या गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप तळीखेडकर विश्राम भाई पटेल सुरेश जोशी गनोरकर विनोदजी तोतला प्रथमेश तळी खेडकर कैवल्य जोशी प्रणव लांडगे सचिन जहागीरदार यांनी मेहनत घेतली

हिंदू संमेलनाला प्रसिद्ध उद्योजक गोपाल

## एमजीएममध्ये शील-समाधी-प्रज्ञा'संगीत प्रस्तुतीचे आयोजन

### एमजीएमतर्फे साजरे होणार बुद्धपौर्णिमेचे पाचवे पुष्प

छत्रपती संभाजीनगर, दि.२९ : बुद्धपौर्णिमेनिमित्त चार संगीत कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनानंतर या वर्षीदेखील महात्मा गांधी मिशन विद्यापीठातर्फे पाचव्या संगीत पुष्पाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता रुक्मिणी सभागृहामध्ये बुद्धपौर्णिमेनिमित्त'शील-समाधी-प्रज्ञा'ही विशेष संगीत प्रस्तुती होणार आहे.

मानवी दुःखाच्या अस्तित्वाचे निरसन करण्यासाठी वैज्ञानिक समीकरण देऊन कार्यकारणभावाच्या प्रक्रियेने संपूर्ण जगाला पवित्र आणि श्रेष्ठ जीवन प्रदान करण्यासाठी सम्यक मार्गाची जाणीव महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी दिली आहे. त्यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण ज्या एकाच दिवशी घडले तो दिवस म्हणजे वैशाख पौर्णिमा अर्थात बुद्धपौर्णिमा होय. बुद्धाने दिलेल्या धम्माचा पाया म्हणजेच 'शील, समाधी आणि प्रज्ञा' होय. हाच तथागतांच्या शिकवणुकीचा सार होय. हेच केंद्र मानून विशेष गीत-संगीताची प्रस्तुती केली जाणार आहे.

महाकवी वामनदादा कर्डक यांच्या निवडक गीतांमधून बुद्ध तत्वज्ञानाचा खोलवर दडलेला आशय श्रोत्यांसामोर उलगडला जाणार आहे. प्रोफेसर संजय मोहड यांनी या विशेष संगीत प्रस्तुतीची निर्मिती केली असून त्यांच्या समवेत विद्यार्थीनी वृंद आणि सहकारी कलावंत यात सादरीकरण करणार आहेत. या प्रसंगी ज्ञानसाधना आणि ज्ञानदानाच्या क्षेत्रात आयुष्यभर काम करणारे तत्वचिंतक, प्रतिभावान लेखक आणि मिलिंद महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे संवेदनशील प्राध्यापक डॉ.मनोहर जिलठे यांचा त्यांनी केलेल्या धम्म, शिक्षण आणि साहित्य इत्यादी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल यथोचित गौरव कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, सौ.अनुराधाताई कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके व सर्व संबंधित मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आहे.

## सोयगाव येथे सन.१९८० च्या विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन कार्यक्रम संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ एप्रिल

जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव या प्रांगणात एस.एस.सी ला सन १९८० ला असणाऱ्या विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर आयोजित केले होते.साधारण तीन महिन्यापासून सर्व मित्रांना व्हाट्सएपच्या ग्रुपवर घेऊन गेट-टुगेदर साठी उपस्थित राहावे असे आव्हाहन ग्रुपच्या वतीने प्रशालेचे माजी प्रभारी मुख्याध्यापक व या बँचचे विद्यार्थी गिरीष जगताप हे करत होते.या हाकेला साथ देऊन आजच्या दिवशी बरेच वर्गमित्र कार्यक्रमासाठी उपस्थित होते. गेटटुगेदरचा कार्यक्रम म्हणजे गुरुवर्य यांची उपस्थिती.

आजच्या दिवशी गुरुवर्य टी.जी.शेळके यांचे वय.८५ वर्ष असताना सकाळी नऊ वाजता वेळेवर उपस्थित होते. तसेच गुरूवर्य एल.एस.रोकडे यांचे वय.७५ वर्ष असले तरीही सकाळपासून उपस्थित होते. सन.१९८० चे जुने विद्यार्थी पाहून त्या दोघांचे मनही भरुन आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य टी.जी.शेळके होते. तसेच गुरुवर्य लक्ष्मण रोकडे,प्रशालेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड व माजी शिक्षक पिंगाळकर शाळेच्या शिक्षिका मंगल बोरसे हे व्यासपीठावर विराजमान होते. सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शेळके सरांनी भुषवावे अशी विनंती केली.अध्यक्ष निवडल्यानंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व्यासपीठावरील मान्यवरांनी केले.कार्यक्रमाची प्रस्तावना गिरीष जगताप यांनी केली.प्रस्तावनेतून त्यांनी कार्यक्रमासाठी येणाऱ्या अनेक अडचणी असल्या तरी आपल्या वर्गमित्रांना भेटण्याची ओढ या संदर्भात बालपणातील आठवणीची आठवण करुन दिली.

## नवीन बोल्ड लुक, उत्साही नवीन मूड: मिरिंडाकडून जगभरात "स्माइल प्लीज" प्लॅटफॉर्मचे अनावरण




छत्रपती संभाजीनगर , २८ एप्रिल २०२६ : मिरिंडाने आज नवीन ब्रँड व्हिज्युअल ओळखीसह 'स्माइल प्लिज' या एका नवीन जागतिक प्लॅटफॉर्मच्या उद्घाटनाची घोषणा केली. दैनंदिन जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी, उत्साह आणण्यासाठी आणि पहिल्या नजरेतच चेहऱ्यावर स्मितहास्य आणण्यासाठी मजेदार आणि प्रभावी उपक्रम आणले आहेत.

आजचे जीवन व्यग्र आणि तणावपूर्ण झाले आहे आणि लोक अनेकदा आपल्या सभोवतालच्या छोट्या, आनंदी क्षणांचा आनंद घ्यायला विसरतात. पण चेहऱ्यावरील हास्य ही एक अशी गोष्ट आहे जी लगेच मनःस्थिती सुधारू शकते आणि इतरांना देखील हसण्यासाठी प्रेरित करू शकते.

पेप्सिकोच्या डिझाईन अँड इनोव्हेशन टीमने जेन झी ला डोळ्यांसमोर ठेवून तयार केलेले हे ताजेतवाने स्वरूप ग्राहकांसाठी ब्रँडशी जोडले जाण्याचा एक भावपूर्ण, समकालीन आणि भावनिक मार्ग प्रतिबिंबित करते. यात बोल्ड टायपोग्राफी आणि मिरिंडाच्या खास रंगसंगतीचा वापर केला असून चैतन्यशील, भलेमोठे फळांचे स्वरूप प्रत्येक कॅन आणि लेबलवर झळकतात. हे आकार अर्धवर्तुळाकृती असून त्यातून हास्य आणि आनंद प्रतिबिंबत होतो. त्यामुळे न बोलताही या आकारातून आनंददायी संदेश दिला जातो.

ब्रँडच्या परंपरेतून प्रेरणा घेऊन लोगोला ताज्या, तारूण्यपूर्ण ऊर्जेने नव्याने साकारण्यात आले आहे. गडद रंगछटा आणि भरपूर कॉंट्रास्टचा वापर केल्यामुळे मिरिंडाचे धाडसी व्यक्तिमत्त्व आणि आशावादी वृत्तीसह प्रत्येक फ्लेवर अधोरेखित होतो.

पेप्सिकोच्या आंतरराष्ट्रीय पेये विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, युजीन विलेमसेन म्हणाले: "मिरिंडा कायमच स्व- अभिव्यक्तीचे प्रतीक राहिली आहे आणि आता आम्ही तीच भावना एका जागतिक चळवळीद्वारे जिवंत करत आहोत, जी ताजी, खेळकर आणि समर्पक वाटते. धावपळीच्या आणि सततच्या गोंगाटाच्या जगात, कधीकधी हसण्याचे एक साधे कारण खूप महत्त्वाचे ठरू शकते. आमच्या नवीन

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मनपाच्या प्रत्येक विभागावे सुरु असलेल्या कामकाजाचा आ. अमित देशमुख आढावा घेणार

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** मनपाच्या प्रत्येक विभागावे सुरु असलेल्या कामकाजाचा आ. अमित देशमुख आढावा घेणार आहेत. यामध्ये नगररचना विभागव केंद्रस्थानी असणार आहे. हद्दवाढ, नवीन लेआऊट आणि इमारत परवानग्यांचा आढावा घेतला जाणार आहे. विशेष म्हणजे रिंगरोडवरील अतिक्रमण काढून रस्ते वाहतुकीसाठी खुली करणे हा देखील बैठकतील मुद्दा असणार आहे. तर रेकॉर्ड उपलब्ध नसताना कोणत्या आधारे नगररचना विभागाने बांधकाम परवाने दिले हे मुद्दे राहणार आहेत. अधिकारी तसेच पदाधिकारी बैठकीला हजेरी लावणार आहेत.



## विविध वृत्त...

## 'नीट' परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाय योजना करा : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** लातूर जिल्ह्यातील ३४ परीक्षा केंद्रांवर आगामी ३ मे २०२६ रोजी नीट युजी २०२६ परीक्षा पार पडणार असून, सुमारे १६ हजार ३०० विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत. वाढते तापमान आणि उष्णतेच्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन सर्व परीक्षा केंद्रांवर आवश्यक सज्जता आणि उपाययोजना ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिले आहेत. जिल्हा प्रशासनाने या परीक्षेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक घेतली असून विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विविध पावले उचलली जात आहेत.

वाढत्या उष्णतेचा विचार करता प्रत्येक परीक्षा केंद्रावर आरोग्य पथके तैनात केली जाणार आहेत. या पथकांकडे उष्माघातावरील उपचारासाठी आवश्यक औषधे मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील, तसेच वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णवाहिकांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांसाठी सावलीची व्यवस्था आणि दिशादर्शक फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, शहरात विद्यार्थी आणि पालकांची होणारी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाला चोख बंदोबस्ताचे आदेश दिले आहेत.

**गतिशील तपासणी प्रक्रिया आणि दंडाधिकारी नियुक्ती**

परीक्षा केंद्रांवर होणारी विद्यार्थ्यांची तपासणी आणि बायोमेट्रिक हजेरीची प्रक्रिया अधिक गतिशील करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना विनाकारण विलंब होणार नाही. सुरक्षेच्या आणि नियोजनाच्या दृष्टीने प्रत्येक केंद्रावर कर्तव्य दंडाधिकारी म्हणून महसूल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, भरारी पथकेही गठीत करण्यात येणार आहेत.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'डॉ. वाघमारे अध्यासन केंद्र' स्थापन करा; आ. रोहित पवार यांची राज्यपालांकडे मागणी

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. २९ एप्रिल :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे संस्थापक कुलगुरू तसेच थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या नावाने विद्यापीठात 'अध्यासन केंद्र' स्थापन करण्यात यावे, तसेच विद्यापीठाच्या लातूर येथील उपकेंद्रात त्यांचे स्मारक उभारण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार रोहितदादा पवार यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीचे निवेदन देताना लातूर येथून ड. निशांत वाघमारे आणि संजय शेटे उपस्थित होते.

राज्यपालांना देण्यात आलेल्या निवेदनात डॉ. जनार्दन वाघमारे सरांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करण्यात आला आहे. डॉ. वाघमारे हे केवळ विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरूच नव्हते, तर मराठी भाषा, साहित्य, समीक्षा, शिक्षण, तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. मराठवाड्यासारख्या भागातील उच्च शिक्षणाचा पाया त्यांनी मजबूत केला. ग्रामीण आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेले दूरदर्शी आणि पुरोगामी शैक्षणिक नेतृत्व कायम स्मरणात राहील, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

डॉ. जनार्दन वाघमारे यांचे साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अफाट आहे. त्यांचे वैचारिक मार्गदर्शन आणि वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या उद्देशाने त्यांच्या स्मरणार्थ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'डॉ. जनार्दन वाघमारे अध्यासन केंद्र' तातडीने स्थापन करावे व याबाबत सर्व संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, अशी विनंती आ. रोहित पवार यांनी केली आहे.

अध्यासन केंद्रासोबतच, डॉ. वाघमारे यांच्या कार्याचा गौरव म्हणून विद्यापीठाच्या लातूर येथील उपकेंद्रात त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी विशेष मागणीही यावेळी करण्यात आली. या महत्त्वाच्या मागणीच्या वेळी लातूरचे प्रतिनिधी म्हणून ड. निशांत वाघमारे आणि संजय शेटे हे समवेत उपस्थितीत होते.

## सरकारी कार्यालय परिसरात घाणीचे साम्राज्य



तभा वृत्तसेवा

**लातूर दि २९ एप्रिल :** येथील गांधी चौकात असलेली विभागीय शिक्षण उपसंचालक आणि जिल्हा परिषद चे आरोग्य विभाग हे कार्यालय परिसरात सध्या केर कचरा आणि घाण जमा झाल्याचे पाहायला मिळते. परिसराच्या स्वच्छतेची मागणी वाढीस लागली आहे.

असून या ठिकाणी कार्यरत आहेत म्हटले तर अतिशयोक्ती ठरूनये कारण त्या परिसरात केर.कचरा साठा मोठ्या प्रमाणात जमा असल्याचे दिसत असून बाजूला हातगाडे दिसत आहे.

बरेच व्यापारी आपल्या दुकानानील कचरा तेथेच टाकत असल्याने कचरा दिवसादिवस वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो याकडे गांर्भियाने शासकीय यंत्रणेने घ्यावे . अशी मागणी होत आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात तीन जिल्ह्यांतील पदाधिकारी, कार्यकर्ते येत असल्यामुळे हा परसिर साप करुन होणाऱ्या रोगराई पासून मुक्त करावा अशी मागणी होत आहे.

## ७० लाखांसाठी विवाहितेचा छळ

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** 'तु आम्हाला पसंद नाही, तुझ्या आई-वडिलांनी मनासारखे लग्न करुन दिले नाही' आता शेत घेण्यासाठी माहेरहून ७० लाख घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ केल्या प्रकरणी सासरच्या ५ जणांवर विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

विवाहानंतर काही महिन्यातच फिर्यादी रेश्मा (वय ३१) यांना सासरच्या मंडळीकडून शारीरिक आणि मानसिक त्रास सुरु झाला. नांदेड येथे शेत घेण्यासाठी माहेरहून ७० लाख रुपये घेऊन ये म्हणत मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी फिर्यादीचे पती दत्तप्रसाद ज्ञानेश्वर महामुने, सासू शोभा ज्ञानेश्वर महामुने, सासरे ज्ञानेश्वर महामुने, नणंद शिल्पा वसंत पंडीत, दीर सुधीर महामुने (रा. तरोडा नगर, नांदेड) यांनी शिवीगाळ करुन मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी ५ जणांविरोधात सोमवार (दि. २७) रोजी गुन्हा दाखल केला आहे. पोनि संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार आर.ए. गुंडरे हे अधिक तपास करीत आहेत.

## चिमणी,पाखरांसाठी केली पाण्याची सोय

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. २९ एप्रिल :** औसा एम.आय.डी. सी. येथील मुंदडा सिमेंट प्रॉडक्ट या ठिकाणी पक्षी मित्र महेबूब चाचा यांच्या मदतीने अजय मुंदडा यांनी चिमणी पाखरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. या परिसरात विविध प्रकारची, फळझाडे, फुल झाडे वृक्ष आणि वेली, लावली असुन, त्यांची योग्य ती देखभाल केल्यामुळे हा परिसर आज अत्यंत सुशोभीत आणि, निसर्गरम्य दिसत आहे. झाडे, वृक्ष, वेली, निसर्ग निर्मीत, अडचळणीच्या जागा, अशा ठिकाणी वन्य जिव, पशु पक्ष्यांची, निवास्थाने आणि वास्तव्ये असतात. या निसर्ग रम्य बागेत पशु पक्ष्यांचा राबता वाढलेला दिसुन येत आहे.

## शिक्षकांचे समायोजन व पदोन्नती तात्काळ स्थगित करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा




**लातूर दि. २९ एप्रिल :** येत्या १६ मेपासून जनगणना सुरु होणार असून, त्या पार्श्र्वभूमीवर सध्या शिक्षकांचे भर उन्हात प्रशिक्षण सुरु आहे. शासनाने समायोजन, पदोन्नती व बदली करु नये, असे परिपत्रक जारी करुनही स्थानिक प्रशासनाने समायोजन व पदोन्नतीवर अडून बसले आहे. त्यामुळे जनगणेच्या कामात मोठा व्यत्यय निर्माण होणार असून, हा राष्ट्रीय कार्यक्रमात खोडा घालण्याचे काम प्रशासनाकडून केले जात आहे.

त्यामुळे तात्काळ समायोजन व पदोन्नती स्थगित करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने जिल्हाधिकाऱ्यांकडे मंगळवारी एका निवेदनाद्वारे केली आहे.

लातूर जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून उन्हाचा पारा ४२ शी ओलांडात आहे. अशा परिस्थितीही शिक्षकांचे प्रशिक्षण सुरु आहे. राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून सर्वजण सहकार्य करीत आहेत. परंतु, स्थानिक प्रशासन समायोजन व पदोन्नतीवर अडून बसले आहे. केंद्र व राज्य शासनाने यापूर्वी बदली करु नये, असे सूचित केलेल असताना समायोजन व पदोन्नती म्हणजे एक प्रकारची बदलीच होय. तरीही प्रशासन या बाबीवर अडून बसले आहे. जर पदोन्नती व समायोजन

झाले तर जनगणेच्या कामाचा बट्ट्याबोळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तात्काळ समायोजन व पदोन्नती स्थगित करावे. तसेच जनगणना करणाऱ्या शिक्षकांना मोबाईल, टॅब द्यावा, उन्हाची तीव्रता लक्षात घेता प्रशिक्षणाची वेळ सकाळी ७ ते १२ करावी, २०११ जनगणने प्रमाणे सुट्टीचा कालावधीत केलेल्या कामाबद्दल २०११ च्या संदर्भानुसार /शासन निर्णयानुसार अर्जित रजेची मान्यता मिळावी, जनगणनेच्या मानधनात वाढ करावी, प्रगणक / पर्यवेक्षकांना विमा संरक्षण कवच द्यावे, उष्माघाताची लाट असल्यामुळे बचावात्मक साहित्य कर्मचाऱ्यांना द्यावे, महिलांना जनगणनेच्या कामातून कार्यमुक्त करण्यात यावे आदींसह मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यातवीने जिल्हाधिकाऱ्यांना मंगळवारी देण्यात आले.

या मागण्यांचा विचार न केल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही संघाने दिला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष विजयकुमार गुत्ते, जिल्हा सरचिटणीस केशव गंभीरे, जिल्हा उपाध्यक्ष नागेश पाटील, शहराध्यक्ष राहुल देशमुख व नंदकुमार कांबळे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## लातुरात कामगार दिनानिमित्त मेळावा

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने ३ मे रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील दयानंद कॉलेज सभागृहात लातूर जिल्ह्यातील कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात केंद्र सरकारने २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केले आहेत. या कायद्याचे कामगारांवर काय विपरीत परिणाम होणार आहेत, केंद्र व राज्य सरकारची कामगारविषयक भूमिका, जिल्हा व राज्य पातळीवरील कामगारांच्या प्रश्नांची चर्चा करून ठराव करण्यात येणार आहेत. या मेळाव्याला केरळचे माजी सनदी अधिकारी कन्नन गोपीनाथन, महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार कर्मचारी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील शिंदे, महाराष्ट्र काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार, कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. उपस्थितीचे आवाहन संयोजकांनी केले.

## आ. अमित देशमुख यांनी साधला नागरिकांशी संवाद



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री त'ा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दि. २८ एप्रिल २६ रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्याशी संवाद साधला. तसेच त्यांच्या अडीअडचणी, समस्या जाणून घेऊन त्यांची निवेदने व निमंत्रनाचा स्वीकार करीत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधितांना सूचना केल्या.

यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्रीशेल उटगे, लातूर शहर महानगरपालिका स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, विलास को-ऑपरेटिव बँक व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, माजी महापौर दीपक सुळ, उत्तर नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश पावडे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रवीण पाटील, पत्रकार बशीर शेख, पृथ्वीराज गोरे, राजेसाहेब सवई, उमेश बेद्रे, बादल शेख, विष्णुदास धायगुडे, अरफात खान, भालचंद्र येडवे, रफिक पटेल, व्यंकटेश पुरी, इसरार सगरे, अशोकराव सूर्यवंशी, नागनाथ साळुंके, अमर खानापुरे, प्रल्हाद जाधव, हुकुमचंद कलंत्री, ईश्र्वरप्रसाद डागा, आदी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात 'सेवा हक्क दिन' उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. २९ एप्रिल :** प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता आणून नागरिकांना विनासायास शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आज लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात 'सेवा हक्क दिन' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नूतनीकरण करण्यात आलेल्या 'आदर्श सेतू केंद्रा'चे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते करण्यात आले. हे केंद्र नागरिकांना अधिक जलद आणि सुलभ सेवा देण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाने सज्ज करण्यात आले असून, उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते उपस्थित नागरिकांना विविध शासकीय दाखल्यांचे व प्रमाणपत्रांचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले.

या निमित्ताने आयोजित मुख्य कार्यक्रमात मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे राज्य मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले, ज्यामध्ये जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष सभेत उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी उपस्थित सर्वांना 'लोकसेवा हक्क हमी'ची शपथ दिली. नागरिकांना तत्पर आणि दर्जेदार सेवा देण्याचा निर्धार यावेळी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेने व्यक्त केला. या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांच्यासह महसूल विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'सेवा हक्क दिना'चा हा उपक्रम केवळ जिल्हा मुख्यालयापुरता मर्यादित न राहता, लातूर जिल्ह्यातील सर्व ५ उपविभागीय अधिकारी कार्यालये आणि १० तहसील कार्यालयांमध्येही एकाच वेळी प्रभावीपणे राबविण्यात आला. सर्व कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवा हमीची शपथ घेऊन नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवा वेळेत पुरवण्याबाबत कटिबद्धता दर्शवली.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ७५ फुटी स्मारक हैदराबादच्या धर्तीवर भव्य करावे

### बौद्ध समाजाची आ. अमित देशमुख यांच्याकडे मागणी

### स्मारकाचा आराखडा जाहीर करून निधी वाढवण्याबाबत निवेदन



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे उभारण्यात येत असलेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा आणि स्मारकाच्या संदर्भाने भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या नेतृत्वात बौद्ध समाजाच्या शिष्टमंडळाने बाभळगाव निवासस्थान येथील झालेल्या या भेटीत स्मारकाच्या उभारणीबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन देण्यात आले.

यावेळी हैदराबाद येथील स्मारकाप्रमाणे हे स्मारक भव्य दिव्य करावे, प्रशासन या स्मारकाच्या संदर्भाने पारदर्शकता आणि स्पष्टता पाळत नाही, त्यामुळे समाजासमोर या स्मारकाचा प्रारूप आराखडा प्रस्तुत करण्यास सांगावे, स्मारकाचा विस्तार करून त्यासाठी अधिकचा निधी मंजूर करून घ्यावा आदी मागण्या असलेले निवेदनही या शिष्टमंडळाने यावेळी माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांच्याकडे सुपूर्द केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य दिव्य स्मारक लातूरात होत आहे याचा आम्हाला आनंद आहे, मात्र, मंजूर १० कोटी निधी मधून कोणती कामे होणार आहेत? एकूण प्रकल्प किती रकमेचा आहे? या संदर्भात शासनाकडून कोणतीही माहिती जाहीर केली जात नाही, ती माहिती जाहीर करायला सांगावी. सध्या काम चालू असलेली जागा अत्यंत अपुरी आहे ती वाढवून घ्यावी, चबुतऱ्याची उंची २० फुटापर्यंत वाढवावी, भव्य दिव्य पुतळ्या सोबतच स्मारक परिसराच्या विकासाचा एकत्रित प्रकल्प आराखडा तयार करून त्यासाठी आवश्यक निधी मंजूर करावा, त्यानंतरच हे काम होईल हे पहावे, कोणत्याही परिस्थितीत निधीअभावी हे काम अर्धवट राहणार नाही याची दक्षता घेण्यासाठी पाठपुरावा करावा आदी मागण्या निवेदनाद्वारे यावेळी आमदार अमित देशमुख यांच्याकडे करण्यात आल्या आहेत.

या शिष्टमंडळातील सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आपलीही शिष्टमंडळाच्या सूचनेप्रमाणेच भूमिका आहे असे त्यांनी सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणी सोबतच या संपूर्ण परिसराचा एकत्रित विकास आराखडा तयार करावा, या परिसरात असलेल्या सर्व व्यवस्थांचे पुनर्नियोजन करावे, या परिसरात पुन्हा पाणी साचणार नाही यासाठी ड्रेनेजची व्यवस्था करावी, आदी सूचना आपण यापूर्वीच दिल्या असल्याची माहिती शिष्टमंडळाला यावेळी त्यांनी दिली.

प्रारंभी भिक्खू पय्यानंद थेरो यांचे बाभळगाव निवासस्थानी यथोचित सन्मान करून त्यांचे आशीर्वाद घेतले. या शिष्टमंडळात माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, चंद्रकांत चिकटे, सुशिल चिकटे, यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

## अग्रलेख...

# निसर्गाशी वैर घातकच!

निसर्गावर सतत चालून जाणाऱ्या माणसाच्या अंगावर कधीतरी निसर्ग येणारच ना...! तो येतोय; आलाय. पृथ्वीचे नैसर्गिक कवच कमकुवत करून कथित विकासाच्या मार्गावर बेधुंद धावणाऱ्या पावलांना तीव्र होत चाललेल्या उष्णतेच्या लाटा कधीतरी अडवणारच. त्या तशा अडवीत आहेत. निसर्गाशी संघर्ष करून काँक्रीटची जंगले उभारणाऱ्या माणसाला सावलीसाठी शेवटी पुन्हा झाडांच्याच छायेत यावं लागणार. कारण माणसांच्या जगण्याचा मूळ आधार त्याच्या सभोवतालचा निसर्गच आहे. निसर्गाशी वैर करून विकासाचे नवे मार्ग शोधता येत नसतात; उलट असा विकास शेवटी विनाशाचाच मार्ग ठरतो, हे सिद्ध झाले आहे. हवा, पाणी, अन्न, ऋतूंचा समतोल आणि आरोग्य या मानवी जीवनाच्या सर्व मूलभूत गरजा निसर्गावरच अवलंबून आहेत. मात्र, विकासाच्या नावाखाली माणसाने निसर्गाचा समतोल बिघडविला आहे. अतिरेकी वृक्षतोड, वाढते प्रदूषण, बेफाम शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अनियंत्रित वापरामुळे पर्यावरणाची घडी विस्कटली आहे. त्याचे सर्वाधिक तीव्र परिणाम आज वाढत्या तापमानाच्या रूपाने आपल्याला भोगावे लागत आहेत. सध्याच्या तापमानामुळे आपण पृथ्वीवर आहोत की एखाद्या अग्निग्रहावर, असा प्रश्न पडण्यासारखे वातावरण आहे.

एप्रिल महिन्यातच मे महिन्याहून अधिक तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत आहेत, विहिरी कोरड्याठाक पडल्या आहेत, उष्माघाताचे रुग्ण दररोज वाढत आहेत. बेवारस लोक तर जिवाला मुकत आहेत. आपल्याला पृथ्वीच्या संपूर्ण संहाराच्या दिशेने जायचे नसेल तर निसर्गाशी चाललेला संघर्ष तत्काळ थांबवावाच लागेल. निसर्ग आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट देतो; पण आपण त्याच्या अस्तित्वावरच घाव घालत आहोत. त्यामुळे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन आणि इतर वायूंचे प्रमाण सतत वाढत चालले आहे. 'ग्लोबल वॉर्मिंग' ही आता केवळ शास्त्रीय संकल्पना राहिलेली नाही; ती प्रत्येकाच्या दैनंदिन आयुष्यात उतरलेले वास्तव आहे. तापमानातील वाढ ही फक्त उन्हाच्या झळांपुरती मर्यादित नाही; तापमानवाढीचा परिणाम शेती, अर्थव्यवस्था, आरोग्य आणि सामाजिक स्थैर्यावरही खोलवर होत असतो. शेतकऱ्यांसाठी तापमानवाढ म्हणजे थेट संकटाचे दार असते. तापमानवाढीमुळे पिकांना योग्य वेळी पाऊस मिळत नाही, जमिनीतील ओलावा कमी होतो, विहिरी आटतात आणि उत्पादन खर्चही वाढत जातो. शेती हा ग्रामीण जीवनाचा कणा आहे; तोच डगमगला तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडते. शेतकऱ्यांच्या संकटाचा परिणाम थेट बाजारपेठेवर, महागाईवर आणि सर्वसामान्यांच्या जगण्यावर होतो. सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. उष्माघात, निर्जलीकरण, त्वचारोग, रक्तदाबातील चढउतार, हृदयविकार आणि श्वसनाचे आजार झपाट्याने वाढत आहेत. लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला आणि दिवसभर उन्हात काम करणारे कामगार यांना सर्वाधिक धोका असतो. रस्त्यावर काम करणारे मजूर, पोलिस, वाहतूक कर्मचारी, बांधकाम मजूर आणि शेतकरी हे दररोज जीव धोक्यात घालून आपले कर्तव्य पार पाडत असतात. त्यांच्यासाठी हे वाढणारे तापमान जीवघेणे ठरत आहे.

काँक्रीटच्या उंच इमारतींपेक्षा हिरवी झाडे, वेगवान रस्त्यांपेक्षा जिवंत नद्या आणि तात्पुरत्या सुविधांपेक्षा शाश्वत पर्यावरण अधिक महत्त्वाचे आहे. निसर्गाशी समतोल साधणे ही आता अपरिहार्यता बनली आहे. कारण निसर्ग वाचला तरच माणूस वाचेल. पाणीटंचाई ही वाढत्या तापमानाची आणखी एक गंभीर बाजू आहे. उन्हाळा वाढला की पाण्याची गरज वाढते; दुसरीकडे जलस्रोत मात्र दिवसेंदिवस आटत जातात. तलाव कोरडे पडतात, विहिरींचा तळ दिसतो, नद्यांचा प्रवाह कमी होतो आणि भूजल पातळी झपाट्याने खाली जाते. अनेक गावांमध्ये टँकरच्या भरवशावर जगावे लागते. पाण्यासाठी वाद होतात, संघर्ष वाढतात आणि काही ठिकाणी स्थलांतराची वेळही येते. भविष्यातील युद्धे पाण्यासाठी होतील, हा इशारा लवकरच खरा ठरेल असे वाटू लागले आहे. या बदलामुळे मानवी जीवनातील मानसिक ताण मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. सततची उष्णता, पाण्याची चिंता, शेतीतील नुकसान, आरोग्याचे वाढते प्रश्न आणि महागाईच्या ताणामुळे अस्थिरता आणखी गडद होत चालली आहे. पर्यावरणाचा प्रश्न केवळ निसर्गप्रेमाचा विषय राहिलेला नाही; तो थेट सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि माणसाच्या जीवनाच्या गुणवत्तेशी जोडला गेला आहे.

या पृष्ठभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो; तो असा की विकासाच्या नावाखाली आपण नेमके काय गमावत आहोत? उंच इमारती, रुंद रस्ते, नवे उद्योग आणि वेगाने वाढणारे शहरीकरण ही विकासाची चिन्हे नक्कीच असू शकतात; पण जर त्यासाठी झाडे कापली जात असतील, नद्या मरत असतील, डोंगर नाहीसे होत असतील आणि तापमान असह्य होत असेल, तर अशा विकासाला टिकाऊ किंवा शाश्वत कसे म्हणायचे? पर्यावरणाचा नाश करून उभा राहिलेला विकास शेवटी मानवी अस्तित्वालाच धोका निर्माण करणार आहे. यावर उपाय नाहीत असे नाही; पण त्यासाठी तातडीची आणि सामूहिक कृती आवश्यक आहे. वृक्षलागवड आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे वृक्षसंवर्धन, पावसाच्या पाण्याचे संधारण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पर्यावरणपूरक शहर नियोजन, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर, प्रदूषणावर नियंत्रण आणि शाश्वत विकासाच्या धोरणांना प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. उष्णतेच्या वाढत्या लाटांचा सामना करण्यासाठी शासनानेही स्वतंत्र आणि प्रभावी कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. नागरिकांनीही आपल्या जीवनशैलीत बदल करणे तितकेच गरजेचे आहे. पाणी वाचवणे, प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, झाडे लावणे, ऊर्जा बचत करणे आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नाही; ती सामाजिक बांधिलकी आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळणे म्हणजे केवळ निसर्गाचे नुकसान नाही, तर ती माणसासाठी धोक्याची घंटा आहे. आज आपण सावध झालो नाही, तर उद्या उष्णतेच्या या लाटा आपल्याला जगणे कठीण करतीलच. निसर्गाशी संघर्ष करून नव्हे, तर त्याच्याशी समतोल साधून मानवी जीवन सुरक्षित, समृद्ध आणि शाश्वत राहू शकते.

आज राज्यातील तापमानाची स्थिती पाहिली तर हा इशारा किती गंभीर आहे, याची जाणीव अधिक तीव्रतेने होते. विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा यांसारख्या शहरांनी ४६ अंशांच्या पुढे झेप घेत राजस्थानलाही मागे टाकले आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि इतर शहरांमध्येही एप्रिल महिन्यातच मेच्या झळा जाणवत आहेत. हे वाढलेले तापमान म्हणजे निसर्गाचा संयम संपत चालल्याच्या स्पष्ट खुणा आहेत. निसर्ग आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडत आहे की, विकासाच्या या शर्यतीत आपण जगण्याचाच पाया तर उखडून टाकत नाही ना? प्रश्न फक्त वाढत्या तापमानाचा नाही, तर पुढील पिढ्यांसाठी आपण कसे जग सोडून जाणार आहोत, याचाही आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समतोल असला पाहिजे. निसर्गाला विसरून माणूस विकासाची लढाई कधीच जिंकू शकत नाही; कारण शेवटी त्याचे अस्तित्वही त्याच निसर्गावर उभे आहे. म्हणूनच आता निर्णयाचा क्षण आला आहे. काँक्रीटच्या तात्पुरत्या सुखासाठी भविष्य धोक्यात घालायचे की शाश्वत पर्यावरणासाठी आजच जबाबदारी स्वीकारायची. कारण निसर्गाचा राग सहन करण्याइतकी ताकद माणसाकडे नाही; पण निसर्गाशी मैत्री करून जगण्याइतकी शहाणपणाची संधी अजूनही आपल्या हातात आहे.

## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# 'स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर'चा उदय

गेल्या काही वर्षांमध्ये भारताने पायाभूत सुविधा उभारणीमध्ये मोठी झेप घेतली आहे. महामार्ग, रेल्वे, शहरे आणि डिजिटल नेटवर्क या सर्व क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढली आहे; परंतु आता या विकासाची दिशा बदलत आहे. 'पीएम गती-शक्ती नॅशनल मास्टरप्लॅन' सारख्या उपक्रमांमुळे विविध प्रकल्पांचे एकत्रित नियोजन शक्य झाले आहे, तर 'इंडिया एआय मिशन'मुळे डेटा आणि संगणकीय क्षमता वाढवून निर्णय प्रक्रिया अधिक सक्षम केली जात आहे. या बदलाचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम म्हणजे 'स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर' या संकल्पनेचा उदय. आता केवळ रस्ते बांधणे महत्त्वाचे नाही, तर ते वाहतुकीच्या बदलत्या गरजांनुसार कसे कार्य करतील, हे बघितले जाते. शहरांचा विकास केवळ विस्ताराने नाही, तर व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेने मोजला जाऊ लागला आहे. 'एआय'चा वापर नियोजन प्रक्रियेत अधिक अचूकता आणतो. विविध डेटाचे विश्लेषण करून भविष्यातील गरजा ओळखता येतात. उदाहरणार्थ, वाहतूक, ऊर्जा किंवा पाणीपुरवठा यासारख्या क्षेत्रांमध्ये मागणीतील बदल आधीच लक्षात घेऊन नियोजन करता येते. यामुळे संसाधनांचा अपव्यय कमी होतो आणि प्रकल्प अधिक परिणामकारक ठरतात. तथापि, या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे काही प्रश्नही निर्माण होतात. डेटा हा या संपूर्ण प्रक्रियेचा कणा आहे; पण तो किती सुरक्षित आणि सर्वसमावेशक आहे? अनेक ठिकाणी डिजिटल पायाभूत सुविधा अपुरी आहे. 'नीती आयोगा'च्या अहवालांनुसार, राज्यस्तरीय संस्थांमध्ये डेटा व्यवस्थापनाची स्थिती अजूनही समाधानकारक नाही. दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे कौशल्यांची कमतरता. 'एआय' आणि डेटा विश्लेषणाचा प्रभावी वापर करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक आहे.

जागतिक बँकेच्या मते भारताला स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चरच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर तज्ज्ञांची गरज आहे. याशिवाय, 'एआय'च्या वापरामुळे सामाजिक परिणामांचाही विचार करावा लागतो. स्वयंचलित प्रणालींमुळे काही पारंपरिक रोजगारांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कौशल्यविकास आणि पुनर्प्रशिक्षण (रीस्किलिंग) यावर भर देणे आवश्यक आहे. नैतिकतेचा प्रश्नही येथे महत्त्वाचा ठरतो. निर्णयप्रक्रियेत 'एआय'चा वापर करताना पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाने मानवी निर्णयक्षमतेला पूरक ठरावे, त्याची जागा घेऊ नये, हे येथे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. या सर्व बाबी लक्षात घेतल्यास भारतासाठी पुढील वाटचाल स्पष्ट आहे. पायाभूत सुविधा विकासात 'एआय'चा वापर वाढवणे आवश्यक आहे; परंतु तो विचारपूर्वक आणि संतुलित पद्धतीने करणे गरजेचे आहे. यासाठी मजबूत डेटा प्रणाली, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि स्पष्ट धोरणात्मक चौकट या तीन गोष्टींवर विशेष भर द्यावा लागेल. या तिन्ही बाबींचा समन्वय साधला, तर भारताला



पायाभूत सुविधा विकासात जागतिक नेतृत्व मिळवण्याची संधी आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा भाग आहे. योग्य प्रकारे व्यवस्थापन केले, तर 'एआय' भारताच्या विकासाला नवी दिशा देऊ शकतो. अन्यथा, ही संधी गमावली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतातील पायाभूत सुविधा क्षेत्र एका निर्णायक टप्प्यावर उभे आहे. दीर्घकाळापासून 'रस्ते, पूल आणि इमारती' या पारंपरिक चौकटीत मोजला जाणारा विकास आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा आणि प्रगत विश्लेषण यांच्या आधारे नव्याने आकार घेत आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर विकासाच्या संकल्पनेतील मूलभूत परिवर्तन आहे. प्रश्न केवळ पायाभूत सुविधा उभारण्याचा नाही, तर त्या किती बुद्धिमान, कार्यक्षम आणि शाश्वत असतील, हा आहे. केंद्र सरकारच्या विविध उपक्रमांमुळे भारताने या परिवर्तनाला स्पष्ट दिशा दिली आहे. हजारो ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्सच्या मदतीने डेटा प्रक्रिया क्षमता वाढवली जात आहे, तर राष्ट्रीय पातळीवरील प्रकल्पांचे एकात्मिक नियोजन करून संसाधनांचा अधिक परिणामकारक वापर साधण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रयत्नांमुळे 'विकास' हा शब्द अधिक व्यापक मानला जात आहे. त्यात तंत्रज्ञान, नियोजन आणि अंमलबजावणी यांचा सुसंवाद आवश्यक ठरतो. पारंपरिक पायाभूत सुविधा नियोजनात अनेकदा स्थिर गृहितकांवर आधारित निर्णय घेतले जात. एकच अंदाज, एकच आराखडा आणि त्यानुसार अंमलबजावणी ही पद्धत दीर्घकाळ वापरली गेली; येथेच 'एआय' आणि प्रगत विश्लेषणाची भूमिका महत्त्वाची ठरते. आता नियोजन संभाव्यतेवर आधारित होत आहे. विविध परिस्थितींचे मॉडेल तयार करून, जोखीम मोजून व सतत अद्ययावत डेटा वापरून निर्णय घेतले जात आहेत.

'प्रिडिक्टिव मॉडिलिंग'ने या प्रक्रियेला नवे परिमाण दिले आहे. 'मशीन लर्निंग'च्या मदतीने विविध डेटा संचांचे विश्लेषण करून मागणीतील बदल, खर्चातील वाढ, क्षमता मर्यादा आणि पर्यावरणीय धोके आधीच ओळखता येतात. यामुळे प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच संभाव्य अडचणी स्पष्ट होतात. परिणामी, भांडवलाचे योग्य वाटप, वेळेत प्रकल्प पूर्ण होणे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर शक्य होतो. याचबरोबर, 'एआय' संचालित डिजिटल ट्विन्स ही संकल्पना पायाभूत सुविधा क्षेत्रात क्रांतिकारक ठरत आहे. एखाद्या प्रकल्पाचे आभासी प्रतिरूप तयार करून त्यावर विविध परिस्थितींमध्ये प्रयोग करता येतात. अतिवृष्टी, हवामानबदल, लोकसंख्यावाढ किंवा वाहतुकीतील बदल या सर्वांचा परिणाम आधीच तपासता येतो. त्यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वीच त्रुटी दुरुस्त करता येतात आणि प्रकल्प अधिक सक्षम बनतो. पायाभूत सुविधा क्षेत्र हे स्वभावतः भांडवलीदृष्ट्या खर्चीक आणि जोखमीने भरलेले आहे. कच्च्या मालाच्या कमतीतील चढ-उतार, करारातील अडचणी, वेळापत्रकातील विलंब या सर्वांचा प्रकल्पांवर मोठा परिणाम होतो. अशा परिस्थितीत प्रगत विश्लेषणामुळे गुंतवणूक निर्णय अधिक सुजाणपणे घेता येतात. कोणते प्रकल्प प्राधान्याने राबवायचे, कोणते पुढे ढकलायचे आणि कोणत्या ठिकाणी जोखीम अधिक आहे, याचे स्पष्ट चित्र समोर येते.

'नीती-आयोगा'च्या अभ्यासानुसार, अनेक राज्यस्तरीय संस्थांकडे अजूनही केंद्रीकृत आणि डिजिटल डेटा प्रणालींचा अभाव आहे. अनेक ठिकाणी अजूनही हाताने नोंदी ठेवण्याची पद्धत प्रचलित आहे. अशा परिस्थितीत 'एआय' आणि विश्लेषणाच्या प्रभावी वापरासाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा उपलब्ध नाही. याशिवाय, कौशल्यांची कमतरता हा मोठा अडथळा आहे. डेटा सायन्स, 'एआय' अभियांत्रिकी आणि प्रणाली एकत्रीकरण या क्षेत्रांत प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. या पृष्ठभूमीवर, भारतासमोरची खरी कसोटी सुरू होत आहे. प्रयोग आणि प्रात्यक्षिकांच्या टप्प्यापलीकडे जाऊन 'एआय'चा व्यापक आणि परिणामकारक वापर करण्याची वेळ आली आहे. यासाठी मजबूत डेटा पायाभूत सुविधा उभारणे, कौशल्य विकासावर भर देणे आणि स्पष्ट शासन व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. भारताचा पायाभूत सुविधा विकास हा केवळ भौतिक विस्ताराचा प्रश्न राहिलेला नाही. बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान आणि मानवी विवेक यांच्या संगमातून घडणारी ती प्रक्रिया आहे. हा संगम योग्य प्रकारे साधला गेला, तर भारत केवळ आपली अंतर्गत गरज भागवणार नाही, तर जागतिक स्तरावरही विकासाचा नवा आदर्श निर्माण करू शकेल. अन्यथा, तंत्रज्ञानाची संधी असूनही अपेक्षित परिणाम साधता येणार नाहीत. पायाभूत सुविधा क्षेत्रातील हा बदल केवळ स्वीकारणे नव्हे, तर त्याचे सुजाण आणि जबाबदार व्यवस्थापन करणे हीच खरी गरज आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# ट्रान्सलोकेटेड ट्री नर्सरी...

दिवसेंदिवस वाढणाऱ्या चटक्यांची दाहकता वाढण्यात आपलाही वाटा सिंहाचा आहे. आपल्याला विकास हवा, पण विकास करताना डोळ्यासमोर होणाऱ्या विनाशावर आपण गप्प असतो. मात्र तळपत्या सूर्याला 'बोल' लावून मोकळे होतो. पण तो का तापतो, याचा कधी विचार केलाय का? झाडं कापली जात असताना आपल्या मनाला वेदना होतातच ना? पण प्रशासनातील कर्त्या-करवित्यांच्या मनाचे काय? कुठल्या पर्यायाचा विचार न करताच थेट झाडे कापण्याची परवानगी देणाऱ्यांनाही उन्हाचे चटके बसतच असतील ना? आपण भारतातच राहतो... एका राज्यात सहा हजारांहून अधिक झाडांचे पुनर्रोपण करण्याचा धाडशी प्रयोग होत असेल, तर आमच्याकडे कित्येक दशके वाटसरूंना सावली देणाऱ्या झाडांचा जीव का घेतला जातो. काम सोपं करण्याच्या नादात निसर्गाप्रति आपल्यात आलेला कृतघ्न भाव आपल्याच 'भावी' पिढीचे भवितव्य 'भस्म' करते आहे, हे नक्की! 'ट्रान्सलोकेटेड ट्री नर्सरी' म्हणजेच पुनर्स्थापित वृक्ष रोपवाटिका अनेक प्रश्नांचे एकमेव उत्तर ठरू शकते. बस, सोपा मार्ग स्वीकारून शाश्वत विकासाचे अवास्तव स्वप्न पाहण्याची मानसिकता तेवढी बदलायला हवी. वाटायला, प्रत्येकालाच वाटतं, झाडं कापली जाऊ नयेत, पण त्यासाठी प्रयत्न करणारे किंवा यासाठी पुढे येणारे किती आहेत, हा प्रश्नच आहे. विकास कोणाला नको आहे, पण तो करताना 'विनाश' नको व्हायला, याचीही काळजी घ्यावीच लागेल ना? जो निसर्ग आपल्याला नि:स्वार्थ भावनेने सर्वस्व देतो, वेळ आल्यावर आपण आपल्या स्वार्थासाठी त्याच्या या नि:स्वार्थ सेवेची परतफेड त्याच्याच 'मुळा'वर घाव घालून करतो. राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे सुरू असलेल्या कामात ८० ते १२० वर्षे जुनी शेकडो झाडे कापून जो कृतघ्न भाव यंत्रणेने निसर्गाप्रति दाखविलाय, तो चिंतनीय असाच आहे. जे भंडाऱ्यात घडतंय, ते



भविष्यात आणखी कुठे घडेल. कदाचित अनेक ठिकाणी हे घडूनही गेलं असेल. पायाभूत सुविधा, शाश्वत विकास या सर्व गोष्टी करताना कधीतरी झाडांचा जीव न घेता 'मार्ग' निघू शकतो का? याचा विचार उच्चविद्याविभूषित अधिकारी, नियोजनकर्ते यांच्याकडून झाला आहे का? दुर्दैवाने हे होत नाही, हेच वास्तव आहे. काम सोपं आणि सुटसुटीत करण्याच्या नादात वृक्ष कापण्यासाठी दिली जाणारी परवानगी म्हणजे आपल्या निसर्गाप्रतिच्या उदासीनतेची परमोच्च पातळी म्हणावी लागेल. १०० वर्षे जुने एखाद झाड कापताना जर कुणालाच दुःख होत नसेल तर ही असंवेदनशीलता नक्कीच घातक आहे. आज आमच्याकडे निसर्गाप्रतिची संवेदनशीलता दिसत नसली, तरी भारताचाच एक अविभाज्य घटक असलेल्या आंध्र प्रदेशात मात्र त्यांनी हे करून दाखविले. विकास त्यांनीही केला, पण तो झाडावर कुऱ्हाड चालवून नाही, तर त्यांचे पुनर्रोपण करून, त्यांना जगवून! आंध्र प्रदेशातील अमरावती येथे देशातील पहिली ट्रान्सलोकेटेड ट्री नर्सरी म्हणजे पुनर्स्थापित वृक्ष रोपवाटिका तेथील अमरावती विकास महामंडळाने तयार केली. विकासाच्या आड येणारी झाडे मुळासकट काढून त्यांना शास्त्रोक्त पद्धतीने जतन करून जगविले गेले. वयाच्या १५ वर्षांपासून ते ३०-४० वर्षांपर्यंतच्या झाडांना वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून जमिनीतून काढून एका विशिष्ट प्रकारच्या बॅगमध्ये काही वर्षे जगवून पुनर्रोपण करण्याचा अनोखा प्रयोग येथे सुरू आहे. आज सहा हजारांहून अधिक झाडांचे पुनर्रोपण झाले. वड, पिंपळ, चिंच, आवळा, बहावा अशा अनेक झाडांना तेथील अधिकाऱ्यांच्या संवेदनशीलतेने जीवनदान दिले. जागतिक बँकेने कौतूक केले. आशियाई विकास बँकेच्या १३ सदस्यांच्या पथकाने या प्रकल्पाला भेट देत जागतिक स्तरावर अनुकरणीय असा प्रकल्प असल्याचे सांगितले. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दखल घेत 'अमरावती' मॉडेल शासकीय यंत्रणेने राबवा असे सांगितले. जे आंध्र प्रदेशात शक्य होऊ शकले, ते आपल्याकडे का नाही? आम्हीसुद्धा कधीकाळी पालखी मार्गासाठी १०२५ वडाच्या झाडांचे पुनर्रोपण केले आहे. नागपुरात १८८ वर्षे जुने वडाचे झाड काढून गोरेवाडा जैवविविधता प्रकल्पात लावले आहे. जर आम्ही करू शकतो तर, त्या दृष्टीने प्रयत्न का होत नाहीत. आज आम्हाला मानसिकता बदलण्याची गरज आहे. सर्वस्व गमावून बसण्याआधी भानावर न आल्यास सूर्याला 'बोल' लावण्यासाठीही आपण वाचणार नाही, हे नक्की!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# मोक्षदायिनी सप्तपुरी

आपली भारतीय संस्कृती नैतिक आणि आध्यात्मिक पायावर उभी आहे. चराचरात भगवंत पाहणारे आपण भारतीयत्वाच्या, हिंदुत्वाच्या धाग्यांनी कायम सांधले गेलो आहोत. म्हणूनच इथल्या नद्या, पर्वत, सागर आणि तीर्थक्षेत्रे आपल्या एकात्म भावाचे प्रतीक आहेत. यातलाच भाग म्हणजे आपली हिंदू तीर्थक्षेत्रे आहेत. तीर्थक्षेत्रे भारताला एकाच धाग्यात जोडून ठेवतात. त्यातील सप्तपुरींना मोक्षदायिका म्हणून विशेष स्थान आहे.

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवन्तिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥

गरुड पुराणाच्या १६ व्या अध्यायातील ११३ वा श्लोक आपल्याला सर्वश्रुत आहे. यातील वर्णन केलेल्या सप्तपुरी मोक्षदायी नगरी आहेत. यातील अयोध्या श्रीरामजन्मभूमी म्हणून विश्वविख्यात आहे.

अयोध्या नगरी नित्या सच्चिदानन्दरूपिणी ।
यस्यांशेन वैकुंठो गोलोकादि प्रतिष्ठितः ॥

शरयू नदीच्या तीरावर असलेली अयोध्या नगरी वैवस्वत मनुनिर्मित नगरी आहे. वेद आणि विविध पुराणांत उल्लेख असलेली अयोध्या स्वर्गाचे द्वार असल्याची श्रद्धा आहे. 'अष्टवक्रा नवद्वारा देवानां पुरयोध्या'नुसार अयोध्या ईश्वराने बनवलेले नगर असून जिथे सूर्यवंशी राजे रघुराजे, दशरथ राजे, श्रीरामचंद्र राजे अशा रघुवंशी महापराक्रमी युगपुरुषांच्या पराक्रमाची गाथा आहे. अयोध्या म्हणजे जिथे युद्ध होत नाही कारण इथे सर्व महापराक्रमी, चक्रवर्ती सम्राटांची वंशावळ आहे. कनकभवन, हनुमानगढी, लक्ष्मण किल्ला, नागेश्वर मंदिर अशी पवित्र स्थाने असलेली अयोध्या शरयू नदी आणि भगवान श्रीराम यांच्या अस्तित्वामुळे मोक्षदायी पुरी आहे. याच मालिकेत दुसरे नाव आहे मथुरा नगरीचे. भगवान श्रीकृष्णाची जन्मभूमी असलेली मथुरा यमुना नदीच्या पवित्र तटावर वसलेली असल्याने आणि मथुरेच्या सभोवताली गोकुळ, वृंदावन, गोवर्धन ही पवित्र तीर्थक्षेत्रे असल्यामुळे मोक्षदायी आहे.

नास्ति मे मथुरायाश्च तुल्यं भुवि नभस्तले ।
पाताले च महाभागे मथुरा मम विश्रुता॥

महाकवी कालिदासाच्या रघुवंशात ही नगरी भगवान श्रीरामाचे बंधू शत्रुघ्न राजे यांनी लवणासुराचा वध करून वसविली आहे. मधू नावाच्या राक्षसाची ही राजधानी म्हणून हिचे नाव मधुवन, मधुपुरी, मधुनगरी असाही उल्लेख आहे. राजा अग्रसेन; त्यानंतर कंसाची राजधानी म्हणूनही प्रसिद्ध आहे. श्लोकातील पुढील मोक्षदायी नगरी म्हणजे मायापुरी. मायापुरीला सध्या आपण हरिद्वार म्हणतो.

''हरिद्वारे यदा याता विष्णुपादोदकी तदा ।
तदेव तीर्थं प्रवरं देवानामपि दुर्लभम् ॥''

पुराणात मायापुरी हरिद्वारला कपिला, गंगाद्वार असेही म्हणतात. इथूनच गंगा मैदानी प्रदेशात प्रवेश करते म्हणून गंगाद्वार. शिवालिक पर्वतरांगांच्या पायथ्याशी आणि पापनाशिनी गंगानदीच्या काठावर असलेले हरिद्वार कुंभमेळ्यासाठी प्रसिद्ध आहे. समुद्रमंथनानंतर अमृतकुंभातील अमृताचे काही थेंब इथे पडल्यामुळे इथे कुंभमेळा भरतो. तिथेच ब्रह्मकुंड देखील आहे. भगवान श्रीविष्णूंचे पदचिन्ह इथेच आहे. पदचिन्ह म्हणजे पौडी म्हणून त्या ठिकाणाला 'हर की पौडी' म्हणतात. हा सर्व उल्लेख स्कंद पुराणात आहे. याच मायापुरी हरिद्वार येथे आदिशक्तीचे अंग पडल्यामुळे इथे शक्तिपीठ आहे जे मायादेवी नावाने प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे याच ठिकाणी भगवान शिवाचे श्वसूर श्री दक्ष राजा यांनी यज्ञ केला होता. इथेच दक्षयज्ञ विध्वंस भगवान शिवांनी केला. म्हणून येथील दक्षेश्वर महादेव मंदिर प्रसिद्ध आहे. पुढील मोक्षदायी नगरी म्हणजे काशी विश्वनाथ नगरी. भगवान शिवाच्या त्रिशुळावर स्थित काशी नगरी पवित्र गंगेच्या तीरावर वसली आहे. वेद आणि पुराणात विशेष उल्लेख असलेली ही नगरी. स्कंद पुराणातील विशेष असा काशीखंड तर स्तुती करताना थांबतच नाही. १५०० विविध मंदिरे आणि २५ विशेष घाट असलेली ही पुण्यपुरी. राजा काश यांनी वसविले म्हणून काशी. वरुणा नदी आणि असी नदीच्या तीरावर वसलेले नगर म्हणून वाराणसी. काशी म्हणजे शिव व शिव म्हणजे काशी याचा साक्षात्कार इथे आल्यावर होतो.

शिवः काशी शिवः काशी, काशी काशी शिवः शिवः ।

पुढील मोक्षदायी पुरी म्हणजे कांची पुरी. दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेली ही नगरी तामिळनाडूत वेगावती नदीच्या तीरावर वसलेली पुण्य नगरी. शिव कांची आणि विष्णुकांची अशा दोन प्रभागात विभागलेली ही नगरी श्री वरदराज पेरुमल हे विष्णुमंदिर विष्णुकांची येथे तर श्री कैलासनाथर हे शिवमंदिर शिवकांची येथे आहे. सर्व नगरींमध्ये कांची सर्वश्रेष्ठ आहे.

पुष्पेशू जाती, पुरुषेशू विष्णू, नारीशू रंभा, नगरेशू कांची असा श्लोकच आहे. कांची इथेच कांची कामकोटी शक्तिपीठ आहे. आद्य शंकराचार्यांनी इथेच कामकोटी कामाक्षी मंदिरात श्रीचक्र स्थापन केले आहे. कांची म्हणजे ब्रह्मदेव. इथे ब्रह्मदेवाने तपश्चर्या केली होती त्यामुळे देवीचे दर्शन झाले होते. अजून विशेष म्हणजे इथे पालीची पूजा होते. ''कांची नरदकाचा राजा'' भिंतीवर लिहिले तर पाल येत नाही अशी जुनी श्रद्धा आहे.

पुढील मोक्षदायी पुरी म्हणजे अवंतिका नगरी.

अवन्तिकायां विहितावतारं । मुक्तिप्रदानाय च सज्जनानाम् ।
अकालमृत्योः परिरक्षणार्थं । वन्दे महाकालमहासुरेशम् ॥

सध्या जे उज्जैन महाकाल आहे त्याचे प्राचीन नाव अवंतिका होय. क्षिप्रा नदीच्या तीरावर वसलेले हे नगर उज्जैयनी, कुमुद्वती, विशाला, प्रतीकल्प नावाने देखील ओळखले जात असे. दूषण नावाच्या राक्षसाचा वध भगवान शिवाने करून लोकांचा काल बनलेल्या राक्षसापासून भयमुक्त केले. कालाचाही काल असलेला महाकाल. इथेही दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. इथेच भगवान श्रीकृष्ण, सुदामा ज्या गुरुकुल आश्रमात शिक्षा ग्रहण करीत होते तो सांदीपनी ऋषींचा आश्रम आहे. कालगणनेचे केंद्र पूर्वापार इथेच आहे. येथील काळभैरव प्रसिद्ध असून तो अवंतिका नगरीचा कोतवाल आहे. राजा विक्रमादित्य यांची राजधानी असलेल्या नगरीत शनि मंदिर आणि मंगळनाथ मंदिर कृपादायी आहेत. महाकालेश्वराची भस्मारती फलदायी आहे. आरतीसाठी पूर्वी चिताभस्म वापरत असत म्हणून इथे महास्मशान आहे. मोक्षदायी पुरीमध्ये महत्त्वपूर्ण नाव म्हणजे द्वारावती अर्थात द्वारका पुरी. गोमती नदी आणि सिंधू सागराच्या तीरावर वसलेली ही नगरी प्राचीन कुशस्थळी म्हणून प्रसिद्ध होती. भगवान श्रीकृष्णाने जरासंघादी राक्षसांपासून दूर समुद्रात एका बेटावर बसवलेली ही नगरी. प्रत्यक्ष देवशिल्पी विश्वकर्मा भगवंतांनी श्रीकृष्ण भगवंतांच्या सूचनेनुसार द्वारका पुरीचे निर्माण केले. श्रीमद् पूज्यपाद आदि शंकराचार्यांनी चार धामांपैकी एक असे शारदा पीठ इथेच निर्माण केले. यामुळे हे नगर मोक्षदायी पुरी म्हणून मान्यताप्राप्त पुरी आहे.

सातही पुरी भारताला एकाच धाग्यात जोडण्याचे काम करतात. ''पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळीती'' आसेतुहिमाचल एकसंध राहण्याचे एकमेव कारण म्हणजे आपली तीर्थस्थळे धार्मिक, आध्यात्मिक भावनांनी जोडली आहेत. मोक्षदायी सप्तपुरींची यात महत्त्वाची भूमिका आहे.

९८२२२६२७३५

### तरुणांनी सावध राहायलाच हवं!

आजकाल सगळंच ऑनलाईन झालंय. सोशल मीडिया, नोकरी, मैत्री, नाती सगळीकडे तरुण-तरुणी पुढे आहेत. जसं जग बदलतंय तसं धोके पण वाढलेत. त्यामुळे स्वतःला जपणं, शांतचित्ताने निर्णय घेणं आणि मन खंबीर ठेवणं गरजेचं झालंय. ऑनलाईन असो किंवा प्रत्यक्षात, नात्यांमध्ये फसवणूक, खोटी माहिती, इमोशनल ब्लॅकमेल, डोकं फिरवणं असे प्रकार वाढलेत. म्हणूनच कुणाच्याही जवळ जाण्याआधी थोडं थांबा, विचार करा... आपल्या हिंदू संस्कृतीत नेहमी सांगितलंय की 'संस्कार', 'विवेक' आणि 'मर्यादा' महत्त्वाच्या आहेत. फक्त मनाला वाटतं म्हणून निर्णय घेऊ नका. डोकं वापरा, बरोबर-चूक काय ते तपासा. नातं असो वा आयुष्यातला कोणताही मोठा निर्णय असो, स्वतःचा विचार, घरच्यांचा सल्ला आणि आपले संस्कार हे मोकळेपणाने बोलणं आणि आपल्या मूल्यांशी प्रामाणिक राहणं तितकंच महत्त्वाचं आहे. हिंदू धर्माची शिकवणच अशी आहे, ज्ञानासोबतच चारित्र्य आणि चांगली वागणूक हाच आयुष्याचा पाया आहे. आई-वडिलांनी पण मुलांशी मित्रासारखं वागावं. त्यांना काहीही मनातलं मोकळेपणाने सांगता आलं पाहिजे. सोशल मीडियावर अनोळखी लोकांशी बोलताना तर जपून राहा. जर कुणी फसवत असेल, दबाव टाकत असेल, चुकीच्या मार्गाला नेत असेल तर घाबरू नका. थेट कायदेशीर तक्रार करा. समाजात शांतता, एकमेकांचा आदर आणि समजूतदारपणा ठेवला तरच आपण मजबूत राहू.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

## वाचक पत्रे

### विवाहासाठी पालकांची संमती...

जो उपाय सुचवला आहे, तो मान्य करण्यात अनेक अडचणी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे सज्ञान व्यक्तींच्या विवाहाला अशी परवानगी घेण्याचा कायदा घटनेच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करतो की काय, हे पाहावे लागेल. तसे उल्लंघन होत असेल तर असा कायदा पारित होणारच नाही किंवा घटना दुरुस्ती करून मग पारित करावा लागेल. बरे असा कायदा पारित झाला, तरी व्यवहारात त्याची अंमलबजावणी होणार म्हणजे काय होणार? वधू-वरांच्या पालकांनी सह्या केलेले संमतीपत्र विवाह नोंदणी कार्यालयात सादर करावे लागेल. मग विवाह कायदेशीर होईल. अशा संमती पत्रावर मुलांनी आई-वडिलांवर भावनिक दबाव टाकून (करून) सह्या दिली आणि वडिलांनी दिली नाही किंवा उलट तर मग काय करायचे? की, संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थायी समितीत असते त्याप्रमाणे एका जरी पालकाने नकाराधिकार वापरला की विवाह होणार नाही असे ठरवायचे? नमुन्यादाखल ह्या दोन अडचणी सांगितल्या. अशा अनेक अडचणी निर्माण होतील. उदा. अनाथ मुलांच्या विवाह संबंधित प्रश्न. या सगळ्या प्रकारात होईल ते इतकेच की आजच्या काळात, अगोदरच लग्न जमणे हा प्रश्न बिकट झालेला आहे; तो आणखी अवघड होईल. जेथे विवाहासंबंधी मुले आणि पालक यांच्यात मतभेद होतात, तेथे सर्व ठिकाणी पालकांची बाजू बरोबर आणि मुलांची बाजू सर्वथा चूक असे काही नसते. अनेक वेळा पालक प्रेमविवाहाला जात-पात, घराणे हुंडा, आर्थिक प्रतिष्ठेच्या चुकीच्या कल्पना यामुळे विरोध करतात. असा विरोध करून पालकांनी प्रेमविवाह रोखला तरीही ते रास्तच आहे, असे लेखक महोदयांना वाटते काय? मुळात पालकांनी

### घरांतील ध्वनी प्रदूषण

बाहेरच्या वातावरणात अनेक ध्वनी प्रदूषण आहे. पण घरातही खूप जास्त ध्वनी प्रदूषण आहे. ध्वनी प्रदूषणांची सुरुवात सकाळपासूनच होते. घरांत आधी टीव्ही सुरू होतो. प्रत्येक सदस्याला वेगवेगळे कार्यक्रम पाहायचे असतात. कधी प्रत्येक खोलीत स्वतंत्र टीव्ही असतो. स्वयंपाकघरात कुकरची शिटी ध्वनी प्रदूषणच! ज्येष्ठांना त्याचा त्रास होतो. मग होतो मिक्सरचा रणगाड्यासारखा आवाज. दुपारी लागते वॉशिंग मशीन. त्याचा तासभर आवाज होतोच. उन्हाळ्याचे दिवस आहेत तर कुलर चालू राहणारच; या आवाजांना काहीच करता येत नाही. पूर्वी हे आवाज नव्हते. चुली-शेगड्या होत्या. मध्यंतरी स्टोव्ह होते; तो स्टोव्ह खूप आवाज करायचा. आता गॅस आहे; त्याचा आवाज नाही, पण गॅसवर चिमणी लावली तर तो आवाज होतोच. असे दिवसभर घरांत

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# ०१ मे पासून योगेश्वरीत महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास,स्वा.रा.ती. महाविद्यालय,श्रीमती गो.कु. यो.कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ मे ते ०८ मे पर्यंत चालणाऱ्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन ०१ मे रोजी श्रीमती गो कु यो कन्या विद्यालयात होत असून अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे असून उद्घाटक म्हणून कोल्हापुर येथील लेखक समुपदेशक ॲड. प्रा.श्रीकांत माळकर उपस्थित राहणार आहेत.त्यांचे यशोगाथा जिद्दी व ध्येयवेड्या माणसांची याविषयावर व्याख्यान होणार आहे.

या शिबीरात शनिवार ०२ मे रोजी मुंबई डॉ. मधुबाला जोशी(चिंचाळकर) या अदभूत अंटार्क्टिका (अंटार्क्टिका संशोधन मोहिम ) विषयावर बोलणार आहेत शुक्रवार ०३ मे रोजी लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या आशा सरवदे(भिसे) ह्या महिला सक्षमीकरण या विषयी मनोगत व्यक्त करतील ०४ मे सोमवार डॉ.अरूणा केंद्रे ह्या महिलांचे आरोग्य व बदलती जीवन शैली याविषयी भावना व्यक्त करतील तर मंगळवार ०५ मे ला सोलापुर येथील समीर गायकवाड हे वाचन घडविते सामाजिक वर्तन याविषयी तर बुधवार ०६ मे लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या सुनिता आरळीकर ह्या माझी आत्मकथार हिरकणीचं बिऱ्हाड या विषयी तर ०७ मे रोजी लातुरच्या ॲड.वैशाली लोंढे(यादव) महिलांची सुरक्षा आणि सामाजिक संस्था या विषयावर मत व्यक्त करणार आहेत

०८ मे रोजी शिबीराचा समारोप अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे (जिरंगे) तसेच योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांच्या उपस्थितीत होईल. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन यो.शि.संस्था,योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे न्यास, स्वा.रा.ती. महाविद्यालय, श्रीमती गो.कु. यो.कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

# भौतिक प्रगती बरोबर संतांच्या विचाराच्या स्वागताची समाजाला गरज; महादेव महाराज चाकरवाडीकर

तभा. वृत्तसेवा

**जगाने भारतीय संतांचा गौरव केला आहे |** श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर

तिसऱ्या दिवसाच्या कीर्तनासाठी हजारो भाविकांची गर्दी..



**बीड (प्रतिनिधी) |** भौतिक प्रगती बरोबर संतांच्या विचाराच्या स्वागताची समाजाला गरज आहे. संत विचारा शिवाय झालेली भौतिक प्रगती व्यसनाधीनकडे घेऊन जाते. वैश्विक अनहित टाळण्यासाठी साधू जीवन डोळासमोर ठेवा. संतांचे विचार कृतीत आणले पाहिजेत. असे प्रतिपादन श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते यावेळी उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प विष्णुपंत महाराज लोंढे गुरुजी, श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, ह भ प नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प श्रीकृष्ण महाराज यादव, अच्युत महाराज घोडके, मारुती महाराज चोरमले,अर्जुन महाराज शिंदे, जनार्दन महाराज बांगर,प्रश्नांत महाराज क्षीरसागर,आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे डॉ राजेंद्र वीर यांच्या सह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

# साई मोबाईल शॉपी फोडणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद

**बीड (प्रतिनिधी) |** बीड शहरातील सुभाष रोडवरील साई मोबाईल शॉपी फोडून मोबाईल चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने अटक करत मोठी कामगिरी बजावली आहे. या आरोपीकडून पुणे ग्रामीण व आहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक गुन्ह्यांचाही उलगडा झाला आहे.



दि. १९ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ३.०० ते ३.५० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने साई मोबाईल शॉपीचे सेंटर लॉक व शटरचे कोंडे तोडून दुकानात प्रवेश केला होता. त्याने विविध कंपन्यांचे मोबाईल फोन चोरून नेले होते. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (ए), ३३१ (४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू करत घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढला. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून हा गुन्हा कल्याण येथील सराईत गुन्हेगार रामनिवास मंजू गुप्ता (वय ३७) याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलीस तपासात आरोपीविरुद्ध महाराष्ट्र व गुजरात राज्यात ५० हून अधिक मालमत्तेविरुद्धचे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले. त्यानुसार पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार विशेष पथक गठीत करण्यात आले.

या पथकाने ठाणे, मुंबई, गोवा व गुजरात येथे शोधमोहीम राबवत अखेर दिवा (ठाणे) येथे सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली देत चोरीचे मोबाईल एका तिसऱ्या व्यक्तीकडे दिल्याचे सांगितले.

पुढील तपासात आरोपीने आहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील जिओमार्ट डिजिटल व मधु वाईन, तसेच पुणे ग्रामीण जिल्ह्यातील शिरूर येथील एस.एस. मोबाईल शॉपी फोडल्याचेही समोर आले आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास बीड शहर पोलीस करत असून आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि शिवाजी बंटेवाड, पोउपनि सुशांत सुतळे, पोह/सोमनाथ गायकवाड, मारूती कांबळे, अर्जुन यादव, बाळु सानप, पोअ/मनोज परजणे, अशफाक सय्यद, विकी सुरवसे, तसेच चापोह अतुळ हराळे व सिद्धेश्वर मांजरे यांनी पार पाडली.

# आर्वीत आजपासून हरिनाम सप्ताह; शिवमहापुराण कथेचा रंगणार सोहळा

## नामवंत कीर्तनकारांची लाभणार उपस्थिती

तभा. वृत्तसेवा

**बीड |** शिरुर तालुक्यातील आर्वी येथे श्री संत कुलभूषण महात्मा नगद नारायण महाराज यांच्या कृपेने आणि ब्रम्हलीन स्वामी निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने भव्य 'वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह' व 'शिवमहापुराण कथे'चे आयोजन करण्यात आले आहे. आज बुधवार पासून या भक्तिसोहळ्याला प्रारंभ होणार असून, ६ मे पर्यंत हा सोहळा रंगणार आहे

या सप्ताहाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'शिवमहापुराण कथा'. प्रसिद्ध कथाकार ज्ञानेश्वर महाराज कोटुळे हे आपल्या रसाळ वाणीतून दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत शिवकथेचे निरूपण करणार आहेत. कथेसोबतच सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण आणि १० ते १२ गाथा भजन असे धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक म्हणून गणेश महाराज नावडे हे सेवा बजावणार आहेत.

सप्ताहामध्ये दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा होणार आहे. यामध्ये २९ एप्रिल रोजी माणिकराव महाराज मांगुळकर (जिंतूर), ३० एप्रिल रोजी विवेक महाराज शास्त्री (सिद्धेश्वर संस्थान, शिरूर), १ मे रोजी महंत शिवाजी महाराज (नारायणगड), २ मे रोजी योगीराज महाराज (रामगड), ३ मे रोजी सुशांत महाराज पवने (आळंदी), ४ मे रोजी लक्ष्मण महाराज हिंगे (आळंदी) आणि ५ मे रोजी पांडुरंग महाराज शास्त्री (करंजवन) यांची कीर्तने होतील. बुधवार, ६ मे २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत मत्स्येंद्रनाथ संस्थानचे मठाधिपती स्वामी जनार्दन महाराज यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. उपस्थितीचे आवाहन करण्यात

# चुका शोधून तातडीने मार्ग काढा ; बाळराजे पवार यांनी केल्या सूचना

## पाणी पुरवठ्यासाठी आढावा बैठक संपन्न

तभा. वृत्तसेवा

**गेवराई |** गेवराई शहरातील काही भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून, पाणी पुरवठा संदर्भात काही अडचणी असतील तर त्या तातडीने निर्णय घेऊन निकाली काढा. पाणी पुरवठा हा जिवाळ्याचा आणि संवेदनशील विषय आहे. त्यामुळे, नगर पालिका प्रशासन आणि

नगरसेवकांनी जबाबदारी पार पाडावी, अशा सूचना लोकनेते बाळराजे पवार यांनी येथे आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत दिल्या आहेत. बुधवार ता. २९ रोजी गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पाणी पुरवठा आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, माजी नगराध्यक्ष सुशील

जवंजाळ, गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभूवनकर, ॲड. जिजा घुंबार्डे, राहुल जिजा, शिनूभाऊ बेदरे, माजी नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, माजी उपाध्यक्ष दादासाहेब गिरी, राम पवार, लक्ष्मण चव्हाण, सभापती महेश सौंदरमल, सोपान मडके, प्रशांत राख, बद्दुशेठ, राजेश टाक,राजा पठाण,पीए चव्हाण, ज्ञानेश्वर भाले, भरत गायकवाड, कृष्णा पाटोळे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना बाळराजे पवार म्हणाले की, गेवराई नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाची यंत्रणा चांगले काम करतेय, मात्र आणखी गती वाढवून नगरसेवकांनी वॉर्डातील समस्या जाणून घ्यायला पाहिजेत, त्याचे लेखी निवेदन सादर करा. गेवराई शहरातील सर्व वॉर्डात पाणी पुरवठा व्यवस्थित होतो की नाही, या दृष्टिकोनातून नगरसेवकांनी आढावा घेऊन, त्या समस्या जाणून घ्याव्यात

शहरातील कुठे कमी दाबाने पाणी पुरवठ होतो. त्या संदर्भात काही तक्रारी आपल्याकडे आल्या आहेत. शहरातील काही वार्डात कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. त्यामुळे, नागरीकांना अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे, योग्य निर्णय घेऊन, चुका दुरूस्त करून सर्व वार्डात उच्च दाबाने पाणी पुरवठा करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा ही बाळराजे पवार यांनी शेवटी बोलताना व्यक्त केली. आढावा बैठकीत मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, ॲड. घुंबार्डे,ॲड राजेंद्र राक्षसभुवनकर यांनी भूमिका मांडली. यावेळी गेवराई नगर परिषदेचे नगरसेवक, सभापती, अधिकारी, कर्मचारीवर्ग, नागरिक उपस्थित होते.

# दिवसाढवळ्या बीड शहरातून वृद्ध महिलेची दागिने चोरीले

## दागिने चोरणारे टोळी सक्रिय ?शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार

तभा. वृत्तसेवा

**बीड(प्रतिनिधी) |** बीड शहरात मागील काही महिन्यापासून वृद्ध व रस्त्यावरून एकट्या जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोने चोरीच्या घटना घडल्या आहेत यामुळे महिला वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.



दागिने चोरी होण्याच्या घटना शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत घडत असल्याने दागिने चोरणारी टोळी सक्रिय आहे का?असा प्रश्न सर्वसामान्य पडला आहे.

बीड शहरातील नगर नाका परिसरात एका वृद्ध महिलेची फसवणूक करून सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

देवईबाई किसन बेद्रे (वय ७५, रा. निरगुडी, ता. पयेग्रात्री) या घरकाम करून उदरनिर्वाह करतात. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ एप्रिल रोजी त्या पूर्णवादी बँकेत एफडीची मुदत वाढविण्यासाठी बीड येथे आल्या होत्या. काम आटोपल्यानंतर त्या नगर नाका येथील बेंगलोर बेकरी समोर बसची वाट पाहत थांबल्या होत्या.

दरम्यान, एक अनोळखी महिला त्यांच्याशी संवाद साधत जवळ आली आणि "गळ्यातील सोन्याचे दागिने काढून पिशवीत ठेवा" असा सल्ला दिला. तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवून देवईबाई यांनी गळ्यातील सोन्याची पोत काढून पिशवीत ठेवली. त्यानंतर बसमध्ये चढताना त्या महिलेनं मागून धक्का देत गोंधळ निर्माण केला.

घरी परतल्यानंतर देवईबाईंना आपली पिशवी हरवल्याचे लक्षात आले. पिशवीत ठेवलेली सोन्याची पोत तसेच बँकेचे कागदपत्र चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी तातडीने बीडला येऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

या प्रकरणी शिवाजी नगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून दागिने चोरणाऱ्या अज्ञात महिलेचा शोध पोलिसांनी सुरू केला. दागिने चोरीच्या घटना घडत असल्याने महिला वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

महिलांनी नागरिकांनी अशा प्रकारच्या फसवणुकीपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# प्रीती चव्हाणची मंथन स्पर्धा परिक्षेत भरारी

तभा. वृत्तसेवा



**बीड |** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्होबा तांडा येथील विद्यार्थीनी कु. प्रिती गोरख चव्हाण हीने मंथन स्पर्धा परिक्षेत उतुंग भरारी मारली असून ती महाराष्ट्रातून ७ वी व बीड जिल्ह्यातून २ री येण्याचा बहुमान मिळवला आहे . तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्होबा तांडा ही शाळा छोट्याशा तांड्यात आहे . शाळेची गुणवत्ता पहिल्या पासूनच असल्याने याठिकाणी पटसंख्या चांगली आहे . या शाळेत शिक्षणाबरोबर क्रिडा वक्तृत्व, सांस्कितिक कार्यक्रम घेतले जातात .या वर्षी २०२५ - २०२६ मध्ये झालेल्या मंथन स्पर्धा परीक्षेत शाळेतील इयत्ता पहिली ची विद्यार्थीनी कु. प्रिती गोरख चव्हाण ही राज्यातून ७ वी व जिल्ह्यातून २ री आली असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे . प्रिती चव्हाण एका रिक्षा चालकाची मुलगी असून अभ्यासात खूप हुशार आहे तसेच जिद्दी, चिकाटी व आवांतर वाचन करते . पुढिल भविष्यात ती यश खेचून आणू शकते. प्रिती चव्हाण हिला रोहिदास राठोड सर, उत्तरेश्वर रोडे सर यांचे मार्गदर्शन लाभले . शाळेचे मुख्याध्यापक श्री . रोहिदास राठोड सर, श्री . उत्तरेश्वर रोडे सर लक्ष्मी आई तांड्याचे सरपंच श्री . स्वरूपराव राठोड, बंडा शेठ राठोड, शा. व्यवस्थापन स . अध्यक्ष श्री . भारत चव्हाण, लहू चव्हाण, राजेंद्र चव्हाण, कोंडिराम चव्हाण, भोजा चव्हाण, विठ्ठल चव्हाण, भिमा चव्हाण, नरहरी चव्हाण, राजू चव्हाण व सर्व शिक्षण प्रेमी नागरिकांनी तिचे स्वागत करून पुढिल शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या

# अजितदादाच माझे राजकिय गुरु : खा.सोनवणे

## स्मृती व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प समर्पित, दादांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण

तभा. वृत्तसेवा

**बीड(प्रतिनिधी) |** अजित दादांच्या सहवासात आल्यापासून राजकिय दिशा बदलत गेली.प्रगतीचे नवे मार्ग मिळत गेले.आई-वडिलांनी लहानाचे मोठे केले.परंतु राजकारणात मी जो काही मोठा झालो तो फक्त अजित दादा पवार यांच्यामुळेच. तेच माझे राजकिय गुरु आहेत.त्यांचा आशिर्वाद यापुढेही कायम राहावा म्हणून माझ्या येडेश्वरी साखर कारखान्याच्या परिसरात दादांचे भव्य स्मारक उभे करणार असल्याची माहिती खा.बजरंग सोनवणे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आयोजित अजित स्मृती व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प समर्पित करताना ते बोलत होते. पत्रकार संघाच्या वतीने काल अजित दादांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.




दि.२८ जानेवारी रोजी दादांचे अपघाती निधन झाल्यानंतर त्यांच्या स्मृती जिवंत राहाव्यात , त्यांचे कार्य लोकांच्या समोर सतत राहावे आणि त्यांच्या विषयी कृतज्ञता भाव कायम राहावा यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने बीड येथे २८ फेब्रुवारी पासून अजित स्मृती व्याख्यानमाला सुरु केली. प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला आठवणींचा जागर या निमित्ताने होत आहे. या कार्यक्रमात काल बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित राहून दादांच्या अनेक आठवणी सांगितल्या. या कार्यक्रमाला प्रसिध्द हृदयरोगतज्ञ डॉ.अरुण बडे,दै.लोकमतचे वरिष्ठ उपसंपादक दिनेश लिंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश प्रवक्त्या ॲड.हेमाताई पिंपळे,खो-खोच्या राष्ट्रीय प्रशिक्षक सौ.चित्राताई आगळे,पत्रकार बालाजी तोंडे ,शेतकरी पुत्र धनंजय गुंदेकर आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

# स्वामीचे वारकरी संप्रदायातील योगदान एका जन्मात कळणे शक्य नाही ; विशाल महाराज खोले

## "पिंगळा महाद्वारी बोल बोलतो देखा.." नको नको घालू पिंगा ग अवघा धांगड धिंगा गं " भजनात भाविक तल्लिन; नेकनूर पुण्यतिथी उत्सव.. चौथे किर्तन पुष्प..

तभा. वृत्तसेवा

**बीड ( प्रतिनिधी) |** संत बंकटस्वामीचे वारकरी संप्रदायातील योगदान एका जन्मात कळणे शक्य नाही.स्वामी महाराज यांच्या भजनाने ही भूमी पवित्र झालेली आहे.किर्ती, ज्ञान, समाधी चे दान तुम्हाला देऊन वैकुंठाला निघून गेले. असे प्रतिपादन श्री ह भ प विशाल महाराज खोले यांनी केले.संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवात चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.यावेळी उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, ह भ प नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव,श्री ह भ प श्रीकृष्ण महाराज यादव, अच्युत महाराज घोडके,अर्जुन महाराज शिंदे, जनार्दन महाराज बांगर,प्रश्नांत महाराज क्षीरसागर, यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.



संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प विशाल महाराज खोले मुक्ताईनगर यांचे संपन्न झाले यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या.

करूं तैसें पाठांतर । करुणाकर भाषण ॥१॥

जिहीं केला मूर्तीमंत । ऐसा संतप्रसाद ॥ध्रु.॥

सोज्वळ केल्या वाटा । आइत्या नीटा मागीलां ॥२॥

तुका म्हणे घेऊं धांवा । करूं हांवा ते जोडी ॥३॥

या अभंगात सुंदर चिंतन मांडले..तुकाराम महाराज यांनी केलेला संकल्प या अभंगात सांगतात. जोग महाराजांचे लाडके शिष्य संत बंकटस्वामी महाराज होते. गुरुला शिष्याचा अभिमान होता.इथे राहतात स्वामी बंकट ते येऊ देत नाहीत संकट अशी कोटी केली.वारकरी संप्रदाय प्रगल्भ झाला आहे.यात स्वामींचे योगदान खूप मोठे आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जलजीवन मिशन योजना, घरकुल आणि पाणीटंचाईचा घेतला आढावा

## बैठकीस गैरहजर तीन ग्रामसेवकांना केले तडकाफडकी निलंबीत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

जिल्ह्यातील पाणी टंचाई लक्षात घेता जल जीवन मिशन योजना बाबत तालुक्यातील १११ ग्रामपंचायतीचा आढावा घेण्यात आला जल जीवन मिशन योजनाची कामे पूर्ण करून गावकऱ्यांना पाणी द्या असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी दिले आहेत. या बैठकीत गैरहजर तीन ग्रामसेंवकांना तडकाफडकी निलंबीत करण्यात आले.

हिंगोली पंचायत समिती कार्यालयातील सभागृहात दि २९ एप्रिल रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी पाणीटंचाई, घरकुल तसेच जलजीवन मिशन योजनेचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गडापोड, गट विकास अधिकारी माया वानखडे, सहाय्यक गट विकास अधिकारी विष्णू भोंजे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ गणेश जोगदंड यांची उपस्थिती होती

यावेळी बोलतांना गायकवाड यांनी सांगितले की, गावातून तक्रार येणार नाही याची काळजी घ्यावी. गावातील लोकांच्या तक्रारी गावातच सोडविण्यात याव्यात चांगल्या कामाला नेहमी प्रोत्साहन दिले पाहिजे आणि सर्वांचा सहभाग घेऊन एकत्रपणे काम केले पाहिजे असा संदेश या बैठकीमध्ये त्यांनी दिला आणि गावकऱ्यांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा कसा होईल यावर भर द्यावा.

पाणी टंचाईचा सामाजिक परिणाम अधोरेखित करताना गायकवाड यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, अनेक गावांत महिलांना पाण्यासाठी ३-४ तास खर्च करावे लागत आहेत. यामुळे त्यांचा वेळ वाया जाऊन त्यांना रोजगारापासून वंचित राहावे लागत आहे. जनतेला शुद्ध आणि वेळेवर पाणी मिळणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांची परवड थांबवण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे. सर्व 'ड्राय सोर्स' (कोरडे पडलेले स्त्रोत) हे जल तारा उपक्रमांतर्गत पुनरुज्जीवित करावेत. हे काम मिशन मोडवर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. ग्राम पंचायत अधिकारी यांनी गाव नकाशा तयार करून गावातील सर्व पाणी स्त्रोत रेखांकन करून १५ दिवसात गाव नकाशे तयार करण्याचे आदेश दिले व संभाव्य पाणी टंचाई च्या अनुषंगाने करावयाच्या आवश्यक तरतुदीची माहिती अद्यावत करण्याचे निर्देश दिले.

याचबरोबर घरकुल योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देणे गायरन व इतर ठिकाणी जागा उपलब्ध करून द्यावी विहित मुदतीत घरकुल पूर्ण करून त्याचा लाभ वेळेत दिला पाहिजे असे निर्देश सीईओ विवेक गायकवाड यांनी दिले.

बालसंगोपन अंतर्गत २२५० रुपये प्रति महा मुलींना शिक्षण घेण्यासाठी शासनाकडून देण्यात येते त्यामुळे हे काम वेळेत करावे एकल महिलांचे आयुष्यमान भारत कार्ड काढण्यात यावे आशा सूचना देण्यात आल्या. यावेळी तालुक्यातील ग्राम पंचायत अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# डॉ. प्रज्ञा सातव यांना विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर

## भाजपकडून आतिषबाजी करीत जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

भारतीय जनता पक्षाने विधान परिषदेच्या रिक्त जागेसाठी डॉ. प्रज्ञाताई सातव यांची उमेदवारी जाहीर केली असून, या निर्णयाचे हिंगोली जिल्ह्यात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.उमेदवारीची घोषणा होताच भाजपाच्या वतीने शहराच्या गांधी चौकात कार्यकर्त्यांनी एकत्र येत जल्लोष केला.

१२ मे रोजी होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपच्या वतीने डॉ. प्रज्ञाताई सातव यांना संधी देण्यात आली आहे.हिंगोलीत भाजपा पदधिकारी व कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आतिशबाजी करत मिठाई वाटून आनंद साजरा केला. यावेळी भारतीय जनता पक्षाचा विजय असो जय श्रीराम अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे,माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी जि.प उपाध्यक्ष मिलींद यंबल, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, युवा नेते शशिकांत वडकुते जिल्हा सरचिटणिस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, यांच्यासह नगरसेवक जितसिंग शाहु, कैलाश शहाणे, उमेश गुठ्ठे, बाबा घुगे, सदाशिव सुर्यतळ, श्रीरंग राठोड, जिल्हा उपाध्यक्ष संजय ढोके, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, संजय खंडलेवाल, कैलाश श्रीनाथ, रितेश शहाणे, नितीन राठौर, बाळासाहेब नाईक,चांदु लांडगे, गुड्डु देवकते, अशिष शर्मा उपस्थित होते.

डॉ. सातव यांनी काही महिन्यांपूर्वीच काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांच्या पक्षप्रवेशानंतर भाजपने त्यांच्यावर विश्वास दाखवत ही उमेदवारी दिली आहे. यावेळी बोलताना भाजप नेत्यांनी सांगितले की, डॉ. प्रज्ञाताई सातव यांच्या उमेदवारीमुळे हिंगोली जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळेल आणि आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पंचायत निवडणुकांमध्ये पक्षाची ताकद जिल्ह्यात वाढेल. यावेळी भाजपचे जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोलीत जनगणनेसंदर्भात प्रगणक, पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

भारत सरकारने भारताची जनगणना २०२७ चा कार्यक्रम जाहीर केला असून त्याचा पहिला टप्पा अंतर्गत घरयादी व घर गणना दि १६ मे ते १४ जून या कालावधीत होणार आहे. त्या अनुषंगाने नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली फिल्ड ट्रेनर, पर्यवेक्षक व प्रगणक यांचे दि २८ ते ३० एप्रिल या कालावधीत प्रशिक्षण घेण्यात येत आहे.

या प्रशिक्षणात जनगणना कशी करावयाची याबाबत सविस्तर माहीती देण्यात येत असून ही जनगणना डिजीटल पध्दतीने होणार आहे. विशेष म्हणजे नागरिकांना स्वगणनेचा पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे. नागरिकांनी दि १ मे ते १५ मे पर्यंत स्वगणना दिलेल्या संकेतस्थळावर करावयाची आहे. कोणतेही भाग घर वगळले जाणार नाही यांची प्रगणक व पर्यवेक्षकांनी काळजी घ्यावयाची आहे. तसेच जनतेमध्ये स्वगणनेबाबत जनजागृती करावी अशा सूचना यावेळी मुख्याधिकारी मुंढे यांनी दिल्या. यावेळी फिल्ड ट्रेनर सुनील कांबळे, अणाजी मडावे, अनिल परसवाळे, प्रमोद कांबळे तसेच नगर अभियंता प्रतीक नाईक, जनगणना विभाग प्रमुख सचिन पवार, सर्व प्रगणक, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



**हिंगोली- शहरातील एनटीसी भागातील निधी कॉम्प्लेक्सच्या परिसरात रस्त्यासाठी सोडण्यात आलेल्या खुल्या जागेत अनधिकृत बांधकाम होत असून सदरील खुल्या जागेतील रस्त्यावर अशाप्रकारे साहित्य टाकल्यामुळे रस्ता अडविण्यात आल्याचे दिसत आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### सेवा हक्क दिनी तहसीलदार मांडवगडे यांचा गौरव



हिंगोली- सेनगाव तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी शासकीय सेवा उल्लेखनीय कार्य केल्याकारणाने त्यांना सेवा हक्क दिनी उल्लेखनीय सेवा कार्यमुळे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते मंगळवार रोजी दि.२८ एप्रिल प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आपला सेवा हक्क दिनी गौरव करण्यात येत आहे सन २०२५-२६ या सालात हिंगोली जिल्ह्यातून सेनगाव तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी उत्कृष्ट प्रशासकीय कार्य व सेवा केल्यामुळे त्यांचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. तहसीलदार सखाराम मांडवगडे यांचे नायब तहसीलदार देवराव कारगुडे, अनिल सरोदे, वाकळे, तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी विशाल लोहटे, प्रशांत बोबडे, अशोक देशमुख, विनोद अंभोरे, सखाराम जाधव, यांच्यासह अधिकारी कर्मचारी व तालुक्यातील जनतेतून तहसीलदार मांडवगडे यांना शुभेच्छा देऊन त्यांचे स्वागत केल्या जात आहे.

### सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये डॉ आंबेडकर जयंती



हिंगोली- सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तारोडा (बू) नांदेड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संचालक सुनील राठोड, सह-संचालक मुकुल राठोड आणि मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी 'माझा भीमराया' आणि 'मानवतेचा उत्सव घेऊन भीम जयंती आली' या गाण्यांवर सांस्कृतिक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि कार्य या विषयावर झालेल्या भाषण स्पर्धेत संचिता वाघमारे हिने प्रथम, स्वरा इंगळे हिने द्वितीय तर तृतीय क्रमांक स्वरा ढवळे यांना मिळाला. या तिन्ही विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात विशेष आकर्षण म्हणून सार्थक भवरे, अध्ययन मुळे आणि तनिष नवघडे यांनी आंबेडकरांची वेशभूषा करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर शाळेचे प्रशासक मारुती मेखाले आणि शैक्षणिक समन्वयक केदार शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन खंडू जोगदंड यांनी केले.

# एनटीसी भागातील रस्त्यासाठी असलेल्या खुल्या जागेवर अनधिकृती बांधकाम रोखण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

शहरातील एनटीसी भागातील निधी कॉम्प्लेक्समधील व्यापारी वर्गासाठी व अग्नीशमन दलासाठी ९ मीटरचा रस्त्यासाठी खुली जागा सोडण्यात आली होती परंतु या जागेवर अनधिकृत बांधकाम होत असून ते तत्काळ रोखण्यात यावे अशी मागणी व्यापारी वर्गानी केली आहे. या निवेदनाची दखल घेत मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी अजय जैन यांना पंधरा दिवसाच्या आत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

शहरातील अतिशय मोक्याच्या जागी असलेली एनटीसी भागात निधी कॉम्प्लेक्स उभारण्यात आले. सन २०१४ मध्ये बांधण्यात आलेल्या या कॉम्प्लेक्सची अजूनही स्वच्छता किंवा इतर सुविधा पुरवण्यात आल्या नाहीत. बांधकाम मालकाने याकडे कायम दुर्लक्ष केले आहे. बांधकाम मालक अजय जैन यांनी निधी कॉम्प्लेक्सच्या पूर्वेकडील रस्त्यासाठी खुली जागा सोडली होती. ही जागा निधी कॉम्प्लेक्समधील व्यापारी तसेच अग्नीशमन दलासाठी होती. परंतु रस्ता न करता ही जागा विक्री करण्यात आल्याचा आरोप व्यापारी वर्गानी दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. याबाबत नगर पालिकेने अजय जैन यांना नोटीस पाठविली असून योग्य त्या कागदपत्रासह पंधरा दिवसात लेखी खुलासा मागितला आहे. निवेदनावर राहुल बांगर, किरण गायकवाड, दत्तराव शिंदे, ओंकार सोनुने, विश्वनाथ मांदळे, बंडू घुगे, गजानन बांगर, देवेश भुसांडे, सचिन बांगर, मुरली हेडा, मंगेश चेके, गणेश गिरी, मारोती भूजबळ, डॉ संजय घुगे, आढाव, प्रा ज्योती मस्के, अनिकेत शर्मा यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शेतकऱ्यांना खतांची कमतरता भासणार नाही- कृषी विभाग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

हिंगोली जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६-२७ सुरू होण्यापूर्वी कृषी विभागामार्फत खत उपलब्धतेचे नियोजन पूर्ण करण्यात आले असून, शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची खतटंचाई भासू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड तसेच लातूर विभागाचे कृषी सहसंचालक महेशकुमार तीर्थकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे नियोजन करण्यात आले आहे.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, खरीप हंगामासाठी हिंगोली जिल्हास एकूण ९८ हजार ३०० मेट्रिक टन खताचे मंजूर आवंटन प्राप्त झाले आहे. याशिवाय संरक्षित साठा म्हणून १ हजार ९५० मेट्रिक टन युरिया व ७०० मेट्रिक टन डीएपी खत उपलब्ध ठेवण्यास मंजुरी मिळाली आहे.जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध व्हावे, यासाठी खत कंपन्या, घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेत्यांशी समन्वय साधण्यात येत आहे. तसेच खत साठ्याचे नियमित निरीक्षण करून वितरण व्यवस्थेवर देखरेख ठेवली जाणार आहे.

शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच खत खरेदी करावे, पावती घ्यावी तसेच अनावश्यक साठेबाजी किंवा जादा दर आकारणीबाबत तक्रार असल्यास कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# शहरातील उघडे डीपी बनलेत मृत्युचे सापळे



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २९ एप्रिल**

शहरातील ठिकठिकाणी उघडे पडलेले डीपी, तुटलेले फ्यूज बॉक्स आणि गायब झालेली सुरक्षा कवचं ही केवळ तांत्रिक त्रुटी नसून महावितरणच्या अधिकारी व लाईनमनांच्या उघड बेफिकिरीची आणि निष्क्रियतेची जिवंत साक्ष ठरत आहेत. शहर अक्षरशः विद्युत मृत्यूच्या सापळ्यांचे जाळे बनले असून, नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबवण्याची कोणतीही तातडी यंत्रणेत दिसत नाही.

रस्त्यांवर, गर्दीच्या बाजारपेठांमध्ये, शाळांच्या परिसरात आणि रहिवासी वस्त्यांमध्ये उघडे डीपी खुलेआम उभे आहेत. अनेक ठिकाणी फ्यूज बॉक्सचे दरवाजे तुटलेले, लॉक गायब किंवा वायरिंग पूर्णतः उघडी पडलेली दिसते. गेल्या काही महिन्यांपासून वारंवार वृत्तपत्रांतून आणि स्थानिक पातळीवर तक्रारी करूनही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, लहान मुले खेळत असलेले परिसर, शाळेजवळचे रस्ते आणि जनावरांची वर्दळ असलेल्या भागातही हे विद्युत सापळे उघडेच आहेत. कोणत्याही क्षणी एखाद्या निष्पाप नागरिकाचा किंवा जनावराचा विजेच्या धक्क्याने मृत्यू होऊ शकतो, अशी भीती आता वास्तवात परिवर्तित होत आहे. महावितरणकडून सुरक्षित वीजपुरवठा देण्याचे आश्वासन दिले जाते, मात्र प्रत्यक्षात त्यांची यंत्रणाच नागरिकांसाठी सर्वात मोठा धोका बनली आहे. हे प्रशासन आहे की निष्क्रियतेचा कळस?असा संतप्त प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे.

जर तातडीने या उघड्या डीपी व फ्यूज बॉक्स दुरुस्त करून सुरक्षित केले नाहीत, तर येत्या काळात मोठी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरणच्या संबंधित अधिकारी आणि लाईनमनांवर निश्चित केली जावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# हेल्मेट वापरा, जीव वाचवा अंतर्गत वसमत पोलिसांची जनजागृती रॅली



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २९ एप्रिल**

वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर वसमत शहर पोलिसांनी मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी काढलेल्या भव्य हेल्मेट रॅलीतून नागरिकांना सुरक्षिततेचा ठोस संदेश दिला. हेल्मेट नाही तर प्रवास नाही हा स्पष्ट इशारा देत पोलिसांनी शहरभर जनजागृती मोहीम राबवली.

हिंगोलीचे पोलीस अधीक्षक निलाभ रोहन व अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. पोलीस निरीक्षक सुधीर वाघ यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या रॅलीने शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि वर्दळीच्या मार्गांवरून मार्गक्रमण करत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रॅलीदरम्यान पोलिसांनी केवळ फलक व घोषणांवरच न थांबता, हेल्मेट न घालणाऱ्या दुचाकीस्वारांना थांबवून त्यांना समुपदेशन केले. काही ठिकाणी प्रतीकात्मक कारवाई करून नियमांचे पालन किती महत्त्वाचे आहे, हेही पटवून दिले.

अपघात टाळणे आपल्या हातात आहे. हेल्मेट ही शिक्षा नसून संरक्षण आहे, असे स्पष्ट करत पोलीस निरीक्षक सुधीर वाघ यांनी नागरिकांना कडक शब्दांत सूचना दिल्या. त्यांनी तरुणांमध्ये विशेषतः हेल्मेट वापराबाबत जागरूकता निर्माण होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

या रॅलीत मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. शहरभर घुमलेल्या हेल्मेट वापरा-जीव वाचवा या घोषणांमुळे वातावरण जागरूकतेने भारावून गेले.

# पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाकडून अवैध रेती उपसा विरोधात कारवाई

भा वृतसेवा
ांदेड, दि. २९ एप्रिल -

विशेष पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाने ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कल्हाळ शेवारात अवैध रेती उपसा व वाहतुकीवर कारवाई करुन ८७ लाख रुपयांची साधनसामुग्री जप्त केली. हि कारवाई दि.२८ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता करण्यात आली.



जिल्ह्यात अवैध रेती उपसा तसेच वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर त्यांच्या पथकाने दि.२८ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कल्हाळ शेवारातील वाळू धक्यावर कारवाई केली. इंजिन बोटच्या माध्यमातून नदीपात्रातून वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर या पथकाने तीन इंजिन बोट, एक फायबर बोट, वाळूने भरलेले ३४ तराफे याच्यासहीत एक हायवा, एक जेसीबी मशिन व नदीपात्रातून बाहेर काढण्यात आलेली ६० ब्रास वाळू असा एकूण ८७ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, गणेश धुमाळ यांच्या पथकाने केली.

दरम्यान दि.१ मे पासून नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायाच्या विरोधात पुन्हा मोहिम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# बातम्या, मोर्चे, निवेदने व्यर्थ! इस्लापूर ग्रामपंचायत 'बधीर'; 'हर घर नल' कोट्यवधी खर्चानंतरही नळ कोरडेच

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २९ एप्रिल -**

शहरातील पाणीटंचाई आता केवळ समस्या राहिलेली नसून ती थेट जनजीवन ठप्प करणारे भीषण संकट बनली आहे. मागील अनेक दिवसांपासून इस्लापूरकरांना पाण्याच्या एका थेंबासाठी अक्षरशः वणवण भटकावे लागत असून, नळ आहेत पण पाणी नाही! हीच आजची कटू वास्तवता ठरली आहे. उन्हाच्या तीव्र तडाख्यात कोरडे पडलेले नळ आणि प्रशासनाची बेजबाबदार भूमिका यामुळे नागरिकांचा संताप टोकाला पोहोचला आहे.

वृत्तपत्रांमधून सातत्याने बातम्या, सोशल मीडियावरील आक्रोश, महिलांचे घागर मोर्चे आणि ग्रामपंचायतीला दिलेली निवेदने या सर्व प्रयत्नांनंतरही प्रशासन जागे झालेले नाही. उलट, जनतेच्या आक्रोशाकडे पूर्णतः कानाडोळा केला जात असल्याचे चित्र आहे.

**आम्ही ओरडतोय पण ऐकायला कोणीच नाही!**

हा संतप्त सवाल आता प्रत्येक घरातून ऐकू येत आहे. दरम्यान, सरकारच्या 'हर घर नल' (जलजीवन मिशन) योजनेअंतर्गत इस्लापूरसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखवण्यात आले. कागदोपत्री कामे पूर्ण, पाइपलाइन टाकल्या, नळ बसवले पण प्रत्यक्षात नळ कोरडेच!

**नळ बसले पण पाणी कुठे?**

हा सवाल आता थेट प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवतो आहे.

नागरिकांचा थेट आरोप आहे की, कामांच्या गुणवत्तेपेक्षा बिले काढण्यावरच अधिक भर देण्यात आला. नियोजनाचा पूर्ण अभाव, निकृष्ट दर्जाची कामे, देखरेखीचा अभाव आणि पारदर्शकतेचा अभाव या सर्वांचा मिळून आजची ही दाहक परिस्थिती निर्माण झाली आहे.

**कामे झाली कागदावर आणि जनता आली रस्त्यावर!**

अशी तीव्र प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे.

सर्वात संतापजनक बाब म्हणजे, इस्लापूरपासून अल्प अंतरावर असलेल्या सहस्त्रकुंड परिसरातील पैनगंगा नदी पात्रात पाणी उपलब्ध असतानाही इस्लापूरकरांना पाण्याच्या झळा सोसाव्या लागत आहेत. स्थानिक जलस्त्रोतांचा वापर आणि योग्य नियोजन केले असते, तर आजची ही वेळ ओढवली नसती, असा नागरिकांचा ठाम आरोप आहे.

**पाणी शेजारी पण जनता तहानलेली!**

हा विरोधाभास आता प्रशासनाच्या निष्क्रियतेचा जिवंत पुरावा ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप होत असून, पाणीप्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळेच ही बिकट परिस्थिती निर्माण झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कागदोपत्री सर्व काही सुरळीत दाखवले जात असताना प्रत्यक्षात जनता पाण्यासाठी झगडत असल्याने प्रशासनाचा कारभार पूर्णपणे उघडा पडला आहे.



पाण्याअभावी महिलांना पहाटेपासूनच हंडे-घागरी घेऊन पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. अनेकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत असून, काही ठिकाणी पाण्यावरून वाद, भांडणे आणि तणाव निर्माण होऊ लागले आहेत. सामाजिक सलोख्यालाही तडा जाण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

या पाणीटंचाईचा परिणाम आरोग्य, स्वच्छता, शिक्षण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर गंभीरपणे होत आहे. स्वच्छ पाण्याअभावी आजारांचा धोका वाढत असून, लहान मुले, वृद्ध आणि रुग्ण सर्वाधिक त्रस्त आहेत. शाळकरी मुलांचे शिक्षण बिघडत असून, पाण्यासाठीची धावपळ त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करत आहे.

काही नागरिकांना पाण्यासाठी शेजारच्या गावांवर अवलंबून राहावे लागत असून, दिवसातून अनेक वेळा पाण्यासाठी फेऱ्या माराव्या लागत आहेत. त्यामुळे वेळ, श्रम आणि पैशाचा मोठा अपव्यय होत आहे. निधी गेला योजना आली पण पाणी कुठे गेले?हा प्रश्न आता प्रत्येक इस्लापूरकरांच्या मनात घर करून बसला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता तीव्र झाली आहे.

**कारवाई नाही तर मोठे आंदोलन!**

असा स्पष्ट इशारा नागरिकांनी दिला आहे. तज्ज्ञांच्या मते, तातडीने जलस्त्रोतांचा वापर, गळती शोध मोहीम, पाण्याचे समन्यायी वितरण आणि प्रशासन-नागरिक थेट संवाद या उपाययोजना राबविणे अत्यावश्यक आहे. मात्र, अद्यापही ठोस हालचाल न झाल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे.

एकीकडे कोट्यवधींचा खर्च दाखवला जातो, तर दुसरीकडे जनता पाण्यासाठी त्रस्त हीच इस्लापूरची कटू आणि संतापजनक वास्तवता बनली आहे. प्रशासनाने तातडीने जबाबदारी निश्चित करून प्रभावी पावले उचलली नाहीत, तर येत्या काळात हे संकट आणखी भीषण रूप धारण करेल, अशी भीती व्यक्त होत आहे.

## पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या जिल्हा समन्वयकपदी राम तरटे

**नांदेड** - नांदेड जिल्हा पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या समन्वयक पदाच्या रिक्त जागेवर राम तरटे यांची नियुक्ती करण्यात



येत असल्याची घोषणा राज्य निमंत्रक एस.एम.देशमुख यांनी केली आहे. राज्यातील पत्रकारांवरील वाढते हल्ले रोखण्यासाठी पत्रकार हल्ला विरोधी कृती समित्या अधिक भक्कम, मजबूत करण्याचा निर्णय परिषदेने घेतला आहे.. त्यामुळे आता राज्यात नव्या नियुक्तया तसेच रिक्त जागा तातडीने भरल्या जाणार आहेत. रवी संगनवार यांची नांदेड महानगर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी नियुकी झाल्यापासून समन्वयक पद रिक्त होते. रिक्त पदावर राम तरटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा निमंत्रक प्रदीप नागपूरकर आणि समन्वयक राम तरटे यांनी जिल्ह्यातील संघटन अधिक मजबूत करण्यासाठी वेळ द्यावा अशी सूचनाही राज्य निमंत्रकर एस.एम. देशमुख यांनी केल्या आहेत. जिल्हा समन्वयक पदी निवड झाल्याबद्दल राम तरटे यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

## सिडको येथील इंदिरा गांधी महाविद्यालयात जनगणना कार्यशाळा

**नवीन नांदेड** -जनगणना २०२७ तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन चार्ज अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या उपस्थितीत दिनांक २८ एप्रिल रोजी कार्यालय क्रमांक सहा सिडको अंतर्गत जनगणना २०२७ च्या कामाच्या पहिला दिवस पार पडला. या कार्यक्रमास नियुक्त करण्यात आलेल्या विविध भागातील कर्मचारी प्रगनक व प्रवेक्षक यांनी गैरहजर असल्यास एक हजार दंड व दोषीस तीन वर्षाची शिक्षा होऊ शकते. या कार्यशाळेत पहिल्याच दिवशी पाच कर्मचाऱ्यांची गैरहजेरी दिसून आली. सदरील जनगणना कार्यशाळेचे प्रशिक्षण इंदिरा गांधी महाविद्यालय येथे सुरू आहे. जनगणना २०२७ यासाठी जवळपास प्रगणक व प्रवेक्षक मिळून एकूण १९० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील कार्यक्रमाचे जनगणना विषयक प्रशिक्षण इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी तीन तुकड्या बनवल्या आहेत. त्यामध्ये पहिल्या तुकडीचे प्रशिक्षण २८ ते ३० एप्रिल पासून सुरू झाले आहे. उर्वरित दोन तुकड्यांचे प्रशिक्षण ७ ते ८ मे रोजी नियोजित आहे. या प्रशिक्षण शिबिरास शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजचे ८ विशेष प्रशिक्षक सदरील कर्मचाऱ्याला प्रशिक्षण देणार आहेत. ही जनगणना दोन टप्प्यात होणार असून पहिल्या टप्प्यात प्रति प्रगनक २०० घरांची घर यादी तयार करण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष जनगणना होणार आहे. या योजने दरम्यान कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना २५ हजार मानधन मिळणार आहे. या जनगणना कामकाजात गैरहजर गैरहजर राहिल्यास व त्यात दोषी आढळून आल्यास त्या कर्मचाऱ्यांना जनगणना अधिनियम १९४८ कलम ५ /११ नुसार एक हजार रुपये दंड व तीन वर्षाची शिक्षा होऊ शकते याची नोंद कर्मचाऱ्यांनी घ्यावी. या राष्ट्रीय कार्यक्रमास सर्व कर्मचारी व मनपा तर्फे जनगणना २०२७ च्या कामात सहकार्य करण्याचे आव्हान मनपा सिडको झोनचे सहाय्यक आयुक्त तथा चार्ज अधिकारी डॉ. मिर्झा बेग यांनी केले आहे.

## मुदखेड नगर परिषदेत जनगणनेच्या अनुषंगाने तीन दिवसीय प्रशिक्षण

**मुदखेड** - भारत सरकारच्या जनगणना विभागाच्या निर्देशानुसार देशभर राबविण्यात येणाऱ्या जनगणना २०२७ या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर मुदखेड नगर परिषदेमध्ये आजपासून तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रमास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला आहे. दि.२८ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान नगरपरिषद मुदखेड प्रशासकीय इमारत येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रगणक, पर्यवेक्षक, सहकारी कर्मचारी तसेच जनगणना कार्याशी संबंधित विविध मनुष्यबळ सहभागी झाले असून प्रशिक्षणास मोठा प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमीवर मुदखेड नगर परिषदेत आयोजित करण्यात आलेले हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जात असून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना जगदीश दळवी, चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी, यांचे समन्वयाने फील्ड ट्रेनर एस.बी.छापरवाल, राजेश्वर कोटलवार व प्रकाश कोथळे यांनी जनगणना कार्याची सविस्तर माहिती, माहिती संकलनाचे निकष, घरगुती व वैयक्तिक नोंदींची अचूक पद्धत, डिजिटल माध्यमातून माहिती नोंदणी, क्षेत्रीय सर्वेक्षणातील अडचणी, नागरिकांशी संवाद कौशल्य, गोपनीयतेचे नियम तसेच वेळेत व अचूक काम पूर्ण करण्याच्या पद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन केले आहे. मुदखेड नगर परिषदेमधील कर्मचाऱ्यांचा शहरातील प्रभागनिहाय माहिती, स्थानिक भौगोलिक परिस्थिती,अनुभव लक्षात घेता नगर परिषद कर्मचाऱ्यांचा या प्रशिक्षणातील सहभाग अत्यंत उपयुक्त ठरत आहे. त्यांच्या अनुभवामुळे नियुक्त जनगणना कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजात मोठी मदत होणार आहे. सदर प्रशिक्षणाचे संपूर्ण नियोजन व समन्वय नगर परिषद जनगणना विभाग प्रमुख शैलजा फुलारी, संगणक अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्ध व प्रभावी पद्धतीने पार पडत आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यालय अधिक्षक मीरताई गुंडे, नगर परिषद कर्मचारी दिलीप पवार, रमेश सावंत, मोहन कवळे, सचिन चुंचे, मोहन पांचाळ, गणेश वड्डे, श्रुती कदम, लालबा भेंडेकर, राहुल चौदंते, शोभाबाई चिंतेवाड तसेच इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले असून सर्वांनी जबाबदारीने विविध कामकाज सांभाळले आहे. त्यांच्या सहकार्यामुळे प्रशिक्षण कार्यक्रम सुरळीत व यशस्वीरीत्या पार पडत आहे. प्रशिक्षणादरम्यान जनगणना कार्यातील अचूकता, पारदर्शकता, वेळेचे नियोजन, माहितीची गोपनीयता व नागरिकांशी सुसंवाद या मुद्यांवर विशेष भर देण्यात येत आहे.

## नरसीत रामनवमीची भव्य शोभायात्रा

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २९ एप्रिल -**

श्रीराम जन्मोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त नायगाव तालुक्यातील नरसी येथे दिनांक १ मे २०२६ रोजी शुक्रवारी रोजी भव्य आणि आकर्षक रामनवमी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. धर्म, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या सोहळ्यासाठी संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होण्यास सज्ज झाले आहेत.



या शोभायात्रेची सुरुवात दुपारी ४ वाजता श्री प्रभु राम मंदिर, जुनेगाव नरसी येथून होणार आहे. धर्म, संस्कृती आणि एकतेसाठी एकत्र येऊया, संघटित होऊया, हिंदू शक्ती वाढवूया हा प्रेरणादायी संदेश देत ही शोभायात्रा गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करणार आहे.

यावर्षीच्या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रभु श्रीरामांची भव्य मूर्ती, श्री बजरंगबलीची देखणी मूर्ती, नरसिंह अवताराचा जिवंत देखावा, नंदी-महादेवाचे प्रभावी सादरीकरण तसेच बाहुबली हनुमानाचा भव्य अवतार हे ठरणार आहेत. धार्मिक वातावरण अधिक भारावून टाकण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून पुणे येथील ५०० स्क्वेअर फूट एलईडी स्क्रीन, नेक्सस लाईट्सची आकर्षक रोषणाई आणि ध्वनीव्यवस्था यामुळे शोभायात्रेला आधुनिकतेची जोड मिळणार आहे.

याशिवाय, या पावन दिवशी समाजहित जपण्याच्या उद्देशाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. धार्मिकतेसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा हा स्तुत्य उपक्रम मानला जात आहे.

प्रभु श्री रामनवमी समिती व समस्त गावकरी मंडळी, नरसी यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शोभायात्रेला यशस्वी करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाची नांदेड शहरात मिरवणूक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ एप्रिल -**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचावेत, यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पणेतून तयार करण्यात आलेल्या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भीडेवाडा येथे सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेचा भिडेवाडा चित्ररथाचे नांदेड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात येणार आहे.



शुक्रवार, दि. १ मे रोजी सकाळी १० वाजता जगतज्योती बसवेश्वर महाराज पुतळा नांदेड येथे या चित्ररथाचे आगमण होणार आहे. याप्रसंगी समता परिषदेचे नांदेड शहर जिल्हाध्यक्ष ॲड. संघरत्न गायकवाड व पदाधिकारी, कार्यकर्ते हे सदरील भिडेवाडा भारतातील पहिली मुलींची शाळा या चित्ररथाचे आगमण झाल्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी करणार आहेत.

## ऐन लग्नसराईत ऊसाचे बिल थकले ; शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २९ एप्रिल -**

तालुक्यासह पूर्णा,पालम आणि कंधार परिसरातील शेतकऱ्यांनी नगदी पीक म्हणून मोठ्या प्रमाणावर उसाची लागवड केली. जामगा-शिवणी येथील ट्वेंटीवन शुगर कारखाना सुरू झाल्यानंतर ऊसाला योग्य दर मिळेल आणि वेळेवर पैसे मिळतील, या अपेक्षेने पेनूर, अंतेश्वर, भारसावडा, शेवडी, बेटसांगवी, सायाळ, आडगाव, बोरगाव, बारुळ, पेठवडज, पाणभोसी तसेच पूर्णा तालुक्यातील कळगाव, सातेफळ, पालम, डिग्रस आणि कंधार तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने ऊस उत्पादन केले आणि कारखान्याला पुरवठा केला. मात्र, ऊस देऊन दोन महिने उलटूनही शेतकऱ्यांना बिलाचे पैसे मिळाले नाहीत. सध्या सुमारे ७५ लाख रुपयांहून अधिक रक्कम थकीत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. कारखान्याने प्रतिटन दर जाहीर केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती.

शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन त्यांनी घाम गाळून उत्पादित केलेल्या ऊसाचे हक्काचे पैसे तत्काळ शेतकऱ्याच्या खात्यात जमा करा, अन्यथा कारखान्यावर रुमणे मोर्चा काढण्याचा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने दिला आहे.

सध्या लग्नसराईचा दिवश आहेत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा न झाल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी उसाच्या पैशावरच आपल्या मुला-मुलींच्या लग्नाचे नियोजन केले होते. मात्र पैसे न मिळाल्याने काहींना लग्न पुढे ढकलावे लागले कुटुबावर आर्थिक संकट अधिकच गडद झाले आहे.

या पार्श्वभूमीवर कारखाना प्रशासनाने तात्काळ थकीत ऊसाचे बिल त्यांच्या खात्यात जमा करावे, अशी मागणी केली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जामगा-शिवणी येथील ट्वेंटी वन शुगर कारखान्यावर रुमणे मोर्चा काढून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## साहेबराव देशमुख यांचे निधन

**मुदखेड** -बारड येथील ज्येष्ठ नागरिक कै. साहेबराव भीमराव देशमुख (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने दि.२८ एप्रिल रोजी दुपारी ३.०० वाजता निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे, नात सून असा मोठा परिवार आहे.



त्यांच्या पार्थिव देहावर दि. २९ एप्रिल, बुधवार रोजी सकाळी ११:०० वाजता बारड येथे त्यांच्या राहत्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रकाशराव देशमुख उर्फ बंडू गुरुजी यांचे ते वडील होत.

## दगडू आऊलवार यांचे निधन

**मुदखेड** -शहरातील न्याहळी येथील श्री मारोती मंदीर संस्थानचे उपाध्यक्ष कै.दगडु कोंडिबा आऊलवार यांचे अल्पशा आजाराने दि.२८ एप्रिल रोजी दुपारी ३:४५ वाजता त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते.



त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले व मुलगी नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी दि.२९ एप्रिल रोजी सकाळी ११:०० वाजता न्याहाळी येथिल त्यांच्या शेतामध्ये करण्यात आले. नगरसेवक संजय आऊलवार व विजय आऊलवार यांचे ते वडील होत.

# किनवट नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी प्रशांत कोरडे यांची बिनविरोध

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २९ एप्रिल -**

किनवट नगर परिषदेतील महाविकास आघाडीच्या कोट्यातील रिक्त असलेल्या स्वीकृत सदस्य पदासाठी आज अत्यंत उत्साही वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत शिवसेना (उबाठा) गटाचे शहर प्रमुख आणि युवानेते करण एंड्रलवार यांचे खंदे समर्थक प्रशांत सुरेशराव कोरडे यांची स्वीकृत सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार, आज किनवट नगर परिषदेच्या सभागृहात ही निवड प्रक्रिया पार पडली. महाविकास आघाडीच्या वतीने प्रशांत कोरडे यांचा एकमेव नामांकन अर्ज दाखल झाल्यामुळे पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद एंड्रलवार यांनी त्यांची अधिकृत निवड झाल्याची घोषणा केली.



नगरपरिषदेच्या निवडणुकीवेळी करण एंड्रलवार यांनी प्रशांत कोरडे यांना स्वीकृत नगरसेवकपदाचा शब्द दिला होता. आज तो शब्द पूर्ण केला असुन 'जे बोलतो, ते करून दाखवतो', हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.

प्रशांत कोरडे यांच्या निवडीनंतर राजकीय आणि सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यामध्ये नगराध्यक्ष सुजाता विनोद एंड्रलवार,राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेत्या सौ. बेबीताई प्रदीप नाईक, शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा दादा खराटे, माहूर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष फिरोज दोसांनी , कपिल प्रदीप नाईक, शिवसेना तालुकाप्रमुख मारुती दिवसे पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाप्रमुख प्रकाश गब्बा राठोड, माजी नगराध्यक्ष अरुण आळणे यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**विकास कामांसाठी कटिबद्धः प्रशांत कोरडे**

निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रशांत कोरडे म्हणाले की, मी विद्यार्थी दशेपासून शिवसेना (उबाठा) पक्षात निष्ठेने काम करत आलो आहे. पक्षनिष्ठा आणि जनसेवेमुळेच मला आज ही संधी मिळाली आहे. माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल जिल्हाप्रमुख ज्योतिबा दादा खराटे, युवा नेते करण एंड्रलवार,सौ. बेबीताई नाईक, कपिल नाईक आणि सर्व मार्गदर्शकांचा मी ऋणी आहे. उपेक्षित समाजाच्या समस्या सोडवणे आणि किनवट शहराचा सर्वांगीण विकास करणे ही माझी प्राथमिकता राहील.

प्रशांत कोरडे यांच्या या निवडीमुळे महाविकास आघाडीच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, शहराच्या विकासाला आता अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सभेला उपनगराध्यक्ष हसन लाला, मुख्याधिकारी मुगाजी काकडे,कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट व शिवसेना उबाठा पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

# पो.नि. अतुल भोसले यांच्या नेमणुकीविरोधात गृह विभागाकडे तक्रार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ एप्रिल -**

पोलीस महासंचालकाच्या परिपत्रकाला डावलून बेकायदेशीरपणे स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रभारी पदी अतुल भोसले यांचे नेमणूक करण्यात आल्याची तक्रार ॲड. विजय पाटील यांनी एका निवेदनाद्वारे गृह विभागाचे अप्पर सचिव तसेच पोलीस महासंचालकांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

पोलीस महासंचालकांच्या परीपत्रकानुसार तीन वर्ष पोलीस निरीक्षक म्हणून सलग सेवा होणे आवश्यक आहे, ए ग्रेडचे दोन पोलीस स्टेशन करणे आवश्यक आहे, गुप्तवार्ता विभाग व इतर जे आवश्यक ट्रेनिंग आहे ते करणे गरजेचे आहे तसेच संबंधीत पोलीस निरीक्षकांची कोणतीही चौकशी प्रलंबित असु नये असे स्पषट निर्देश आहेत. परंतु या परीपत्रकाला डावलुन ही नेमणुक करण्यात आली असल्याचे ॲड. पाटील योनी निवेदनात नमुद केले आहे. तसेच जवळपास एक महीण्यापुर्वी एक महिन्यापूर्वी बिलोली येथे विशेष पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाने मोठ्या जुगार अड्ड्यावर कारवाई केली होती तेंव्हा पो. नि. अतुल भोसले यांना नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले होते. तर अंदाज समितीचे शिष्टमंडळ यांनी बिलोली घाटावर भेट दिली त्यावेळी बिलोलीत अवैधपणे होत असलेला रेती उपसा, रेतीचे ढीगारे पाहून तशा अंदाज समितीने नोंद घेत पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांचे काम योग्य नसल्याचा अहवाल शासनाला दिला असुन त्याची चौकशी प्रलंबित आहे. त्यामुळे पोलीस निरक्षक अतुल भोसले यांची नेमणुक नियमबाह्य आहे. पो. नि. अतुल भोसले हे पोलीस महासंचलकांच्या परीपत्रकातील बाबी पुर्ण करत नाहीत त्यामुळे ही नेमणुक महासंचालकांच्या परिपत्रकांची उल्लंघन करून बेकायदेशीरपणे करण्यात आली असुन ही नमणुक रद्द करावी अन्यथा न्यायलयात याचिका दाखल करण्याचा इशारा ॲड. विजय पाटील यांनी दिला आहे.

I TURABUDDIN SHAIKH, (Old Name) R/o House No. 4-26/1, Moulali Galli, Ratnali, Dharmabad District Nanded, MH. I have Changed My Name As TURABUDDIN SHAIKH HUSSAIN SHAIKH (New Name) AHMED Mobile No. 9010000055

